शांतिशोध

लेखक
मो. हबीबुल्लाह
सय्यद हामिद हुसैन

भाषांतर
प्रा. अब्दुर्रहमान शेख

''अल्लाहच्या नावाने, जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे.''

शांतिशोध

(मौलाना हबीबुल्लाह यांचे हे भाषण आहे. त्यांनी हे भाषण अखिल भारतीय जमाअत-ए-इस्लामी हिंदच्या अधिवेशनात रामपूर येथे दि. २१ एप्रिल १९५१ रोजी दिले होते.)

माझ्या प्रिय बंधुनो,

भाषणापूर्वी मी येथे हे स्पष्ट करू इच्छितो की मी जे काही सांगणार आहे ते काही एखाद्या विशिष्ट जातीसाठी अथवा राष्ट्रासाठी नसून ते सर्वसामान्य आहे आणि सर्वांसाठी लागू आहे. मग तो भारतीय असोत की पाकिस्तानचे किंवा इतर कोणत्याही राष्ट्राचे असोत. आम्ही एक विचार, एक परिपूर्ण वैश्विक जीवनव्यवस्थेचे आवाहन समस्त जगाला देत आहोत. विनाभेदभाव, लिंगभेद, जातिभेदाविना समस्त मानवतेच्या भल्यासाठी हे आवाहन आहे. म्हणून माझी विनंती आहे की या आवाहनाला विशिष्ट राष्ट्र अथवा जातिसमूहाच्या फायद्यासाठी नाही तर एक परिपूर्ण जीवनव्यवस्था म्हणून स्वीकारले गेले पाहिजे. मोकळ्या मनाने आणि शांत डोक्याने विचार केला तर कळते की आज माणुसकी जगाच्या कानाकोपऱ्यात रक्ताने माखलेली आहे. या वैश्विक अराजकतेवर पूर्ण उपाय म्हणून या आवाहनाकडे पाहिले पाहिजे.

महोदय, आज जगाची जी केविलवाणी स्थिती आहे ती अत्यंत स्फोटक स्वरूपाची आणि भयानक आहे. मानवी जीवनाचे कोणतेच असे क्षेत्र नाही ज्यात उपद्रव, अशांती, दंगेधोपे नाहीत. चहूकडे मानवीजीवन विषादपूर्ण व दुःखमय बनले आहे. एक वैश्विक दुर्दशा आणि उद्विग्नता पसरलेली आहे. वैश्विक गोंधळ माजलेला आहे, अफरातफरीची स्थिती आहे. जग अस्वस्थ बनले आहे. ही दुर्दशा आणि विषादपूर्ण स्थिती कुण्या विशिष्ट राष्ट्रापुरतीच मर्यादित राहिलेली नाही. ही समस्या फक्त आशिया अथवा युरोप खंडापुरती मर्यादित नाही की भारतापुरती मर्यादित राहिली नाही. आज पृथ्वीवरील कोणता भाग या उपद्रवापासून आणि दुर्दशेपासून सुरक्षित राहिला आहे? आज समस्त मानवता तडफडत आहे, विवश आहे, अस्थिर आहे. म्हणून या समस्येला एखाद्या राष्ट्राची, जातिसमूहाची किंवा एखाद्या खंडाची समस्या समजली जाणे एक घोडचूक ठरेल. ही एक वैश्विक समस्या आहे. जे लोक अथवा देश या स्थितीशी संतुष्ट नाहीत आणि कुणीही असू शकत नाही त्यांचे कर्तव्य आहे की त्यांनी या वैश्विक समस्येसाठीचे समाधान शोधावेत. आज या वैश्विक समस्येची स्थिती अशी आहे की मनुष्य हा दलदलीतून बाहेर पडण्याचे जितके प्रयत्न करतो तितकाच तो या दलदलीत पुरता रूतून बसत आहे. ही वैश्विक समस्या आणि दुर्दशा, वैश्विक विनाश आणि उद्विग्नता एक बुद्धीविवेकपूर्ण मनुष्याला अनुमती देत नाही की त्याने या विषादपूर्ण व

दु:खमय जागतिक स्थितीकडे दुर्लक्ष करावे.

या वैश्विक समस्येचे आणि वैश्विक विनाशाचे समाधान ज्या प्रकारे होत आहे तसेच त्याच जिद्दीने आणि गांभीर्याने या समस्त बिघाडांचे मूळ कारण शोधले गेले पाहिजे. जर हे केले गेले नाही तर माणुसकीच्या या विषादपूर्ण स्थितीसाठीचे प्रयत्न एक आंधळी सहानुभूतीच फक्त ठरेल. आज जगातील विचारवंत आणि बुद्धीविवेकपूर्ण समाज या वैश्विक समस्येचे समाधान इच्छितो आणि यासाठी अनेकानेक प्रयत्न त्यांच्याकडून होत आहेत. परंतु जग पाहात आहे की समस्या सुटण्याऐवजी ती अधिकाधिक गुंतागुंतीची बनतच चालली आहे. एखाद्या आजाराने बेजार झालेल्या मनुष्याला तडफडताना सोडून जाणे जसे माणुसकीच्या विरुद्ध आहे तसेच हेसुद्धा अमानवीय आहे की आम्ही फक्त भावनेच्या आहारी जाऊन आणि आंधळ्या सहानुभूतीने विवश होऊन आंधळेपणाने उपाय करावा. मग त्या उपायाने ती समस्या आणखीन का वाढेना! आम्हाला जर खरोखरीच सहानुभूती असेल तर आमचे हे प्रथम कर्तव्य आहे की आम्ही मानवतेच्या या आजारावरील पूर्ण उपाय शोधावा आणि त्यावर रामबाण उपाय करावा जेणेकरून मानवतेला जडलेल्या या भयंकर आजारापासून रोगमुक्त करावे. मानवतेला विनाशाच्या खाईत कडेलोट होताना वाचवावे. परंतु वस्तुस्थिती काही वेगळीच आहे. आज या वैश्विक समस्येवर जो रामबाण तोडगा म्हणून वापरला जात आहे त्याने मानवतेचा आजार कमी न होता वाढतच जात आहे. या तोडग्यात आजाराला कमी व नष्ट करण्याची क्षमता नाही. हे सिद्ध झाले आहे. आजतागायतचा अनुभव सांगतो की या वैश्विक महाभयंकर आजारावर केलेला तोडगा सत्यनिष्ट आणि योग्य नाही. येथे या तोडग्यांवर खुलासेवार चर्चा करून त्यांच्या अप्रामाणिकतेला उघड करता आले असते. परंतु विस्तारभयामुळे हे शक्य नाही. आज संपूर्ण विश्व या 'तोडग्यांची' असफलता पाहात आहे. मी येथे त्यांचा धावता उल्लेख करून सत्य उपाय तुमच्यापुढे ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे.

सज्जनहो, काही लोकांचा हा विचार आहे की या समस्त विनाशकारी वैश्विक समस्यांचे मूळ कारण म्हणजे मनुष्याची गरिबी आहे. मनुष्य जेव्हा गरीब बनतो तर सर्व प्रकारचे अनैतिक कार्य करू लागतो. म्हणून गरिबी हटली तर जगात शांतता नांदू शकेल. निश्चितच गरिबी मनुष्याला कधीकधी विनाशाच्या खोल दरीत ढकलून देते. परंतु गरिबीला मूळ कारण समजणे घोडचूक आहे. कारण जगात जी राष्ट्रे आज गर्भश्रीमंत आहेत तिथेसुद्धा अनेकानेक अनैतिक समस्या वाढतच आहेत. आज अमेरिकेसारखे श्रीमंत राष्ट्रसुद्धा अनेक आंतरिक आणि बाह्य समस्यांना तोंड देत आहे. गरिबी सर्व समस्यांचे मूळ कारण असते तर श्रीमंत राष्ट्रांत आपणास बिघाड दिसून आला नसता. दूरचे उदाहरण जाऊ द्या, आपल्या अवतीभोवती भारतात काय फक्त गरीब लोकच दु:खमय आहेत? काय श्रीमंत भारतीय लोक सुखनिद्रा उपभोगत आहेत? काय भारताचा श्रीमंतवर्ग खुशाल आहे? स्पष्ट आहे की असे नाही. जर वस्तुस्थिती अशी नाही आणि

अनुभव जाहीररीत्या ओरडून सांगत आहे की वैश्विक समस्येचे मूळ कारण फक्त गरिबीच नाही.

एका विचारवंत वर्गानुसार शिक्षणाच्या अभावामुळे या वैश्विक समस्या उद्‌भवतात. अशा वेळी मी सांगतो की ही एक वरवरची गोष्ट आहे. शिक्षणाच्या अभावाने या अमाप वैश्विक समस्या आणि अडचणी निर्माण झाल्या असत्या तर ते राष्ट्र जिथे शंभर टक्के साक्षरता आहे तिथे तर सुखसमृद्धी आणि शांतीपूर्ण वातावरण जरूर असते. परंतु अशा शंभर टक्के साक्षर राष्ट्रातसुद्धा मानवी समस्यांची वृद्धी अमाप होत आहे. आपल्या आजूबाजूचाच विचार केला तर निरीक्षर देशात आचारविचारांची मार्गभ्रष्टता ५०% सापडेल तर पूर्ण साक्षर देशातील प्रमाण ८० ते ९०% सापडते. आपल्या आजूबाजूला नजर टाकल्यास कळून येते की नैतिक पतन फक्त अशिक्षित लोकांतच नव्हे तर शिक्षित लोकांतसुद्धा जास्त प्रमाणात आढळून येते. जी दुष्टता, नीचता, मलीनता आणि बरबरता आज आपण आपल्या चहूबाजूला नंगानाच करताना पाहात आहोत, त्यासाठी फक्त अशिक्षितच जबाबदार आहेत आणि त्यासाठी बुद्धिवंत आणि शिक्षित लोकांचा काही एक सहभाग नाही? ते कोण लोक आहेत जे आपल्या मनसुब्याप्रमाणे अशिक्षित लोकांना हाताशी धरून नीचतेचा आणि दुष्टतेचा नंगानाच घालतात? आपल्यापैकी ज्या कोणाला सत्याची चाड असेल तो जरूर म्हणेल की या समस्येमागे समाजातील सुशिक्षितांचाच हात असतो. मग आपण कसे म्हणू शकता की आजच्या वैश्विक समस्यांचे मूळ कारण लोकांची अशिक्षितता आहे. होय, अशिक्षितपणा मानवतेचा एक आजार जरूर आहे. परंतु त्याला समाजाच्या बिघाडाचे मूळ कारण समजने बुद्धीविवेकशीलतेचा अपमान आहे.

काही विचारवंत पुढे जाऊन म्हणतात की 'धर्म' सर्व मानवी समस्यांचे मूळ आहे, म्हणून धर्माला समाजातून खरडून काढून बाहेर फेकले पाहिजे. मी या वादावर जास्त काही बोलणार नाही, परंतु इतके जरूर विचारतो की आज समाजाने धर्माला सार्वजनिक जीवनातून बाहेर काढले आहे. तेव्हा काय कारण आहे की मानवी आचरण व समाजजीवन आज सुधरण्याऐवजी बिघडतच चालले आहे? तुमच्या जीवन समस्यांचे समाधान होण्याऐवजी त्या अधिकाधिक बिकट होत आहेत! मनुष्य दिवसेंदिवस अमानवीयतेचा आणि दुष्टतेचा जास्त नंगानाच खेळत आहे. जर उपद्रव आणि अशांतता, अव्यवस्था धर्मामुळे समाजात निर्माण होते तर मी विचारतो की मग ती महाभयंकर आणि महासंहारक विश्वयुद्धे कोणत्या कारणाने लढली गेलीत? आज तिसरे महायुद्ध टांगत्या तलवारीप्रमाणे मानवतेच्या मस्तकावर लटकत आहे. कोरियामध्ये जे घडले काय ते धर्मावरून घडले? जगात आज इतरत्र जे घडत आहे, काय ते फक्त धर्माच्या नावाने घडत आहे? जर कोणी असे म्हणत असेल की विश्व अशांती आणि उपद्रवाचे मूळ कारण धर्म आहे तर योग्य नाही. धर्माच्या नावाने देशात, समाजात अशांती, अव्यवस्था माजविली

जाते. धर्माच्या नावाने दंगे-धोपे, हिंसाचार होतो. परंतु हा घोर अन्याय आहे जर आम्ही या उपद्रवांना कारणीभूत धर्माला ठरवू कारण धर्म एखाद्या व्यक्तीच्या अथवा व्यक्तिसमूहाच्या स्वत:च्या कार्यशैली आणि विचारशैलीचे नाव नाही. धर्म तर त्या शाश्वत मूल्यांचे नाव आहे ज्यास सृष्टीनिर्मात्याकडून समस्त मानवजातीच्या मार्गदर्शनासाठी पाठविले गेले आहे. आता जर एखादी व्यक्ती अथवा पार्टी धर्माच्या नावावर दंगेधोपे आणि उपद्रव माजवित असेल तर त्याची जबाबदारी धर्मावर टाकली जाऊ शकत नाही. होय, धर्म जर हिंसा, उपद्रव आणि अराजकतेची शिकवण देत असेल तर तो धर्म जबाबदार ठरू शकतो. परंतु ज्याला धर्माचे थोडेफार ज्ञान असेल तो पवित्र कुरआन, वेद, ग्रंथ साहिब या ग्रंथात हिंसेची शिकवण मिळते असे कधीही सांगू शकत नाही. मी मनुष्याच्या बुद्धीला आवाहन करतो की जर धर्म हे सर्व अमानवी कृत्ये करण्याचा आदेश देत नाही तर फक्त धर्माचे नाव घेऊन एखाद्या व्यक्ती अथवा गटाच्या कारनाम्यांना धर्माच्या माथी मारणे काय बुद्धिसंगत आहे?

माझ्या या वरवरच्या खुलाशाने तुम्हाला कळलेच असेल की जे लोक आज ज्यांना बिघाडाचे मूळ कारण समजतात ते एक तर वस्तुस्थितीशी सुपरिचित नसावेत किंवा त्यांची ही एक सुनियोजित अशी मोहीम आहे, जेणेकरून जग धर्माच्या नावाने खडी फोडणारे बनावे.

जर सर्व बाबी चुकीच्या आहेत तरी तो प्रश्न आपल्या जागी कायमच राहातो की जगात जो विनाश आणि बिघाड फैलावत आहे त्याचे काय कारण आहे? येथे तपशीलवार चर्चेची शक्यता नाही तरी मी तुम्हाला या बिघाडाची मूळ कारणे तर स्पष्ट करणारच आहे. ही समस्या एका व्यक्तीची, समूह, जातीची अथवा राष्ट्राचीच फक्त नाही तर ही समस्या वैश्विक समस्या आहे. म्हणूनच या मागचे मूळ कारणसुद्धा वैश्विक असेल. आम्ही पूर्ण विचारांती यावर पूर्ण विश्वास ठेवून आहे की ते वैश्विक कारण दोन प्रकारच्या जीवनप्रणालीत आहे. एकीचे नेतृत्व अमेरिका करते तर दुसरी जीवनप्रणाली रशियामध्ये जन्मली. या दोन्ही जीवनप्रणाली विश्वभरातील राष्ट्रात कार्यान्वित आहेत. आपल्याला हे ऐकल्यावर आश्चर्य वाटले असेल. म्हणून या दोन्ही व्यवस्थेविषयी जाणून घेणे गरजेचे आहे. त्यामुळे वैश्विक बिघाडाच्या मूळ कारणाला समजून घेणे सोपे होईल.

अमेरिकी व्यवस्था पुरातन आहे आणि जगातील बहुतेक देश त्या व्यवस्थेचे पाईक आहेत. या जीवनव्यवस्थेचे तीन भाग आहेत. विचारांती जाणवेल की त्यापैकी प्रत्येक भाग उपद्रव्याला सर्वस्वी जबाबदार आहे. या प्रकारची जीवनव्यवस्था आज अमेरिकेत प्रचलित आहे आणि तिचे अनुयायित्व भारतासारखे जगातील अनेक देश स्वीकारून आहेत. ही जीवनव्यवस्था आपल्या पहिल्या पायरीवरच 'धर्मनिरपेक्ष' होण्याची घोषणा करते. याचा अर्थ हा आहे की अशी राष्ट्रे ईशमार्गदर्शनापासून वंचित राहातात. त्यांना ईशमार्गदर्शनाची गरज भासली तरी ते फक्त वैयक्तिक जीवनापुरतेच

मर्यादित असते. असे ईशमार्गदर्शन फक्त मंदिर, मस्जिद, गिरजाघरपर्यंतच मर्यादित असते. ईश्वर गिरजा, मंदिर, मस्जिदमध्येच फक्त आदेश देतो. या ईश्वराला त्याचे दास परवानगी देत नाहीत की त्याने त्यांचे आंतरराष्ट्रीय संबंध तसेच राजकीय आणि सामाजिक प्रश्नात मार्गदर्शन करावे. अशा निधर्मी जीवनव्यवस्थेत त्या धार्मिक विधींना परवानगी दिली जाते ज्यांचा संबंध वैयक्तिक जीवनाशी आहे. सार्वजनिक जीवनासाठी ठरविले गेले की यासाठी फक्त बुद्धीविवेकानेच काम घ्यावे. अशा व्यवस्थेत ईश्वराचे स्थान असेच बनून जाते जसे कुटुंबात वृद्ध व्यक्तीचे बनते. या जीवनव्यवस्थेत ईश्वराला मर्यादित केले जाते आणि मनुष्याच्या बुद्धीने व अकलेने ईश्वर सत्तेची सीमा ठरविली जाते. अशा व्यवस्थेचा अंतिम परिणाम काय होतो? स्पष्ट आहे की अशा जीवनव्यवस्थेचा परिणाम मनुष्याच्या विनाशाशिवाय दुसरा काय असणार? आज जगात समस्त मानवजात हे भोगत आहे कारण ही विभागणी मुळातच अनैसर्गिक आणि बुद्धिविहीन आहे. ईश्वराला आपल्या वैयक्तिक जीवनात मार्गदर्शक ठरविणे परंतु सार्वजनिक जीवनात मात्र त्या ईश्वराला आणि त्याच्या आदेशांना बेदखल ठरविणे हा मोठा मूर्खपणा आहे. वैयक्तिकरित्या ईशआदेश मान्य परंतु जेव्हा हेच सर्व एकत्र येऊन काही नियोजन करू इच्छितात किंवा आपल्या भावना आणि श्रद्धेला सार्वजनिक स्वरूप देऊ इच्छितात, तेव्हा लोकांना ईशमार्गदर्शनापासून मुक्त ठरविणे, या भयंकर मूर्खतेचा परिणाम शेवटी हाच होतो की मनुष्यजीवन दोन भागांत विभागले जाते. युवा अवस्थेपासून ते मरेपर्यंतच्या जीवनात निरंतर आत्मिक आणि बौद्धिक संघर्षात मनुष्य लिप्त होतो. यापेक्षा असेतरी करा की मनुष्याच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक या दोन्ही जीवनाला ईशसत्तेपासून दूर ठेवा. ईशद्रोह करून आपली स्वत:ची जीवनव्यवस्था बनवा. असे करणे जर शक्य नसेल तर आपल्या या कमजोरी आणि नालायकपणाला लपविण्यासाठी मनघडंत तत्त्वज्ञान बनवू नका ज्यामुळे मनुष्य जीवनभर अव्यवस्थेचा बळी बनेल. हीच वैयक्तिक दुर्दशा जेव्हा सार्वजनिक रूप धारण करते तेव्हा विनाशाचा पाश समाजाला घट्ट पकडतो आणि पूर्ण समाज मानवतेच्या विनाशाचे कारण बनतो.

दुसरे मूळ कारण राष्ट्रवाद आहे. राष्ट्रवादाबद्दल मी जे सांगत आहे ते भारत, पाकिस्तान व इतर देशांपुरतेच मर्यादित नाही तर मी वैश्विक विनाशाच्या दृष्टीने मूळ कारणाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. राष्ट्रवादीचा अर्थ आहे राष्ट्रवादाने पछाडने आणि राष्ट्राबद्दल अतिप्रेमाने त्याची पूजा करू लागणे. ज्या राष्ट्रातील नागरिकांना या राष्ट्रवादाने पछाडलेले असते त्यांच्यासाठी हे लाभकारक असो किंवा नसो परंतु दुसऱ्या राष्ट्रासाठी विनाशकारी सिद्ध होतो. मी येथे देशप्रेमाचा आणि भावनेचा विरोध करीत नाही किंवा त्याला अस्वीकृत करत नाही जो एका नागरिकाला आपल्या दुसऱ्या नागरिकाविषयी असतो. मी या विकृतीला विनाशाचे मूळ कारण म्हणतो जे राष्ट्रवादामुळे आणि विकृत देशभक्तीमुळे नागरिकामध्ये निर्माण होते. राष्ट्रप्रेम आपल्या जागी एक नैसर्गिक गोष्ट

आहे. परंतु त्यापुढे जाऊन जेव्हा एखादा नागरिक किंवा राष्ट्र ही घोषणा करू लागते की माझ्या राष्ट्राच्या फायद्यासमोर इतर सर्व राष्ट्रांचे लाभ तसेच माझ्या राष्ट्राच्या भावनेपुढे दुसऱ्या राष्ट्रांच्या भावनांची काहीच किंमत नाही, तेव्हा मौलिक संघर्षाची येथेच ठिणगी पडते. ही अशा प्रकारची देशभक्ती एक वाईट प्रवृत्ती आहे. अशा प्रकारची देशभक्ती जेव्हा एखाद्या राष्ट्रमनाचा ताबा मिळविते तेव्हा असे राष्ट्र आपल्या उन्नतीसाठी आणि आपल्या प्रतिष्ठेसाठी कोणत्याही थराला जाते. यासाठी नीचतम कृत्य जरी करावे लागले तरी तो नीचतम दुराचार केला जातो. येथे सत्‌चरित्र, नैतिकता, पावित्र्य, नैतिक मूल्ये यांचा प्रश्नच उरत नाही. खरा प्रश्न असा ठरतो की कोणत्या पद्धतीने राष्ट्र उन्नती आणि प्रतिष्ठा मिळते किंवा नाही. ते अशी राष्ट्रभक्ती एखादे राष्ट्र सार्वजनिकरित्या अथवा वैयक्तिकरित्या स्वीकारते, तेव्हा हे मानवतेसाठी भयानक विनाशकारी सिद्ध होते. अशा या वाईट प्रवृत्तीच्या धुंदीत मग्न होऊन पूर्ण विश्व एक पाशवी कृत्याचे 'वैश्विक खेडे' बनून जाते. प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राच्या अस्तित्वाला आपल्या उन्नतीच्या आड समजून दुसऱ्या राष्ट्राला आपला शत्रू समजून बसतो. अशा रीतीने जगात भयानक विनाशकारी स्थिती या अशा प्रकारच्या राष्ट्रवादाने, राष्ट्रभक्तीने आणि देशभक्तीने निर्माण होते. याचा अनुभव जग घेत आला आहे.

लोक जिल्हाभक्ती, प्रदेशभक्ती (प्रादेशिकवाद) आणि वंशभक्तीला (वंशवाद) वाईट समजतात. याचे कारण शेवटी हेच आहे की मानवता अशा प्रकारे विभागली जाते. मानवतेचे हे विभाग आपल्या क्षेत्राऐवजी दुसऱ्या क्षेत्राला अथवा विभागाला सहन करू शकत नाही. हे विभाग पुढे जाऊन एकमेकांच्या विनाशाचे कारण बनतात. या पुराव्यासह पुढे आपण गेला तर आपल्याला माहीत होते की मानवता एखाद्या विशिष्ट जातीचे अथवा राष्ट्राचे नाव नाही तर मानवता ही जगभर पसरलेल्या मानवांच्या समूहाची एक रचनाशैली आहे. जर आम्ही मर्यादित आणि विशिष्ट भागापुरते या विभागणीला (भेदाभेद) योग्य समजत असू तर तत्त्वत: आम्ही मानवतेच्या विभागणीला कसे मान्य करावे? मूलत: कोणत्याच प्रकारची आणि स्तरावरची मानवतेची विभागणी ही अयोग्य, विनाशकारी आणि अनैसर्गिक आहे. राष्ट्रभक्ती, देशभक्ती विसाव्या शतकाची देन आहे आणि विलक्षण अजुबा आहे. जेव्हा एखादा मनुष्य खानदानभक्ती, जिल्हाभक्ती, गावभक्ती, शहरभक्ती आणि प्रदेशभक्ती करू लागतो तर आम्ही त्याला नावे ठेवतो आणि अकलेचे तारे तोडत सिद्ध करतो की हे मानवतेच्या विरुद्ध आहे. परंतु हीच पीडा (आजार) विस्तारित स्वरूपात जेव्हा देशभक्ती आणि राष्ट्रभक्तीचे रूप धारण करते तेव्हा आम्ही त्याच उंदरांना जे या आजाराचा फैलाव मर्यादित स्वरूपात समाजात करत होते, आता विस्तारित स्वरूपात आजाराचे जंतू फैलावताना त्यांना आम्ही 'हिरो' म्हणू लागतो. मला कळत नाही की हा निर्णय कोणत्या अकलेचा आहे. तिसरे मूळ कारण लोकशाही आहे. जेव्हा एखादा मनुष्य म्हणू लागतो की लोकशाही वाईट आहे तर लोक समजतात की हा मनुष्य हुकूमशाहीचा प्रशंसक आहे. परंतु आम्ही लोकशाही आणि

हुकूमशाही या दोन्ही व्यवस्थांना मानवतेसाठी घातक समजतो. लोकशाहीचे दोन प्रकार (रूप) आहेत. एक रूप शोषण करणारे रूप आहे आणि दुसरे रूप खूप विद्रुप आहे. लोकशाही ही अशी दुधारी तलवार आहे की जिची एक धार तर शत्रूला नष्ट करते परंतु दुसरी धार मात्र मानवतेचा गळा कापते. हिच्या फायद्याचे तत्त्व ही आहे की एका मनुष्याला फक्त इतर माणसांवर सत्ता चालवता येत नाही. सत्ता ही लोकांच्या हातात असते. ही लोकशाहीची जमेची बाजू समजली जाते. परंतु या जमेच्या बाजूचा आम्ही धिक्कार करतो कारण ज्या अकलेचा हा निर्णय आहे की एखाद्या व्यक्तीला इतर माणसांवर शासन करण्याचा अधिकार नाही. कोणीही मनुष्य असा नाही की ज्याच्याजवळ सर्व साधनसामग्री असेल आणि एखाद्याला सर्वांची भौतिक आणि मानसिक स्थिती चांगल्या प्रकारे अवगत असणे अशक्य आहे. तसेच असा हुकूमशाह पुढे अत्याचारी बनतो. मी वर नमूद केलेच आहे की असा कोणीच मनुष्य नाही ज्याला अमर्याद ज्ञान प्राप्त असेल की जो प्रत्येक मनुष्याच्या भौतिक आणि मानसिक गरजा जाणून असेल. त्यांच्या वैध आणि अवैध गरजांना जाणून असेल. सत्तेची नशा अशा माणसाला चढणे अशक्य आहे. परंतु मूलत: असा अमर्याद ज्ञानी कोणीही असूच शकत नाही. मग जर एक व्यक्ती या गुणवैशिष्ट्यांना प्राप्त करू शकत नाही तर मग काही व्यक्तींचा समूह त्यांना कसे प्राप्त करू शकतो? आणि ते सत्ताधीश कसे होऊ शकतात? त्या लोक समूहाला आपली सत्ता चालविण्याची परवानगी कशी मिळू शकते? जर एका व्यक्तीची ही पात्रता नाही की त्याने इतर माणसाच्या वैध अवैध भौतिक व मानसिक गरजांना जाणून घ्यावे, त्यांच्या भावनांना ओळखावे. त्याचप्रमाणे माणसाचा एखादा समूहसुद्धा याला अपात्र ठरतो. लोकशाहीचे दुसरे रूप जे अधिक विद्रुप आहे त्याला समजण्यासाठी आपणास काही खुलासा अपेक्षित आहे. त्यामुळे आपणास कळून चुकेल की ही भोळीभाबडी लोकशाही पुढे जाऊन ईशसत्तेलाच आव्हान देते.

प्रत्येक धर्मात व्यभिचाराला वाईट ठरविले आहे. जगातील कोणताच असा समाज नाही जिथे या दुष्कृत्याला धिक्कारित केलेले नाही. परंतु लोकशाही देश या प्रश्नावर विचार करू लागला तर आपल्या अपुऱ्या माहितीवर आधारित हा निर्णय देतात की जर जोरजबरदस्ती झाली नसेल तर तो गुन्हा ठरत नाही. विचार करा की लोकशाहीत कशा प्रकारे अल्लाहने घालून दिलेल्या सीमारेषा तोडल्या जातात आणि याविषयीच्या शाश्वत ईशनियमाला तोडले जाते. (व्यभिचार अवैध आणि धिक्कारित गुन्हा आहे) जगातील प्रत्येक धर्मात आणि प्रत्येक समाजात हा गुन्हा आहे. अशा धिक्कारित गुन्यासाठी शिक्षा ठोठावण्यास असभ्य आणि अमानवी ठरविले गेले. मी येथे ती उदाहरणे देत नाही की ज्या देशांमध्ये हा ईशद्रोही कायदा लागू आहे तेथील सामाजिक आणि नैतिक स्थिती कोणत्या स्तराला जाऊन पोहचली आहे. आपल्यापैकी सर्वांनी या ईशद्रोही कायद्याच्या दुष्परिणामांना पाहिले असणार. अशा देशांमध्ये नागरी जीवन इतके उपद्रवी बनले आहे की तेथील विद्वान लोकांना आपल्या देशाच्या भविष्याबद्दल चिंता

लागून आहे. काही दिवसांपूर्वी लोकशाही पद्धतीने देशात जो कायदा संमत झाला तो फक्त चुकीचाच नव्हता तर त्या कायद्यामुळे समाजात आणि देशात उपद्रव दिवसेंदिवस वाढतच आहे. देशासाठी व समाजासाठी हे विनाशकारी सिद्ध होत आहे.

लोकशाहीचा पुरस्कर्ता आणि संरक्षक दादा अमेरिका आणि अमेरिकन लोकशाहीकडे नमुन्याखातर पाहिले जाते. तेथील लोकशाही समाजातील भांडणतंटे आणि उपद्रव दूर करण्यासाठी दारूला अवैध ठरविण्यासाठी कायदा संमत केला जातो. परंतु काही काळानंतर हा निरसपणा असह्य होतो तेव्हा याच लोकशाहीतील प्रजेचे जनमत अजमावले जाते आणि या जनादेशामुळे जे मागे अवैध ठरविले होते तेच (दारु) वैध होते. हासुद्धा ईशद्रोही कायदा आहे. हीसुद्धा एक हुकूमशाहीच ठरते. येथेसुद्धा आपल्या मर्जीप्रमाणे चालणे आहे आणि तिथे (लोकशाहीत) सुद्धा आपल्या मर्जीप्रमाणे चालणे आहे. म्हणून तुम्ही जेव्हा हुकूमशाहीला वाईट समजता तेव्हा का म्हणून लोकशाहीला वाईट आणि हानिकारक समजू नये? अमर्याद स्वरूपाच्या लोकशाहीत समाजाची प्रगती न होता तो अधोगतीला लागतो. अशा लोकशाहीत जनमतांची खरेदी विक्री सुरू होते आणि सत्तेत धोकेबाज, गुंडप्रवृत्तीचे लोक, दुष्ट लोक जाऊन बसतात. अशा या अनिर्बंध लोकशाहीत बुद्धिवान, नैतिक आणि ईशपरायण लोक सत्तेपासून दूर फेकले जातात. अशी लोकशाही पुढे भांडवली लोकशाहीत बदलून जाते जिथे मूठभर लोकांच्याच हातात अमाप संपत्ती जमा होते. यावर कोणीही प्रतिबंध लावू शकत नाही कारण लोकशाही आहे आणि सत्ता आणि नियम कायदे बनविणे भांडवलदारांच्याच हातात असते. परिणामत: एकीकडे अमाप श्रीमंती तर दुसरीकडे दारिद्र्य! अशा देशात मानवता आर्थिक दृष्टीने दोन भागांत विभागली जाते. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी वाढतच जाते.

देशातील तो वर्ग जो भांडवली लोकशाहीत बरबाद होतो व गरीब बनतो त्याच्या सुटकेसाठी साम्यवाद पुढे येतो. युरोपच्या आर्थिक इतिहासाकडे पाहिले तर कळून येते की जेव्हा देशातील मूठभर लोकांनी देशाची सर्व उत्पन्नाची साधने आपल्या हातात ठेवून देशातील धन आपल्या हातातच एकवटले तेव्हा दुसरीकडे सामान्य जनता गरीब आणि आणखी गरीब होत गेली. सर्वसामान्य जनतेची आर्थिक स्थिती बिकटतम होत गेली. अशा स्थितीत देशात अशांतता आणि अस्वस्थता निर्माण होणे साहजिक आहे. ही नैसर्गिक बेचैनी वाढतच गेली तेव्हा तेथील विद्वान मंडळींनी या समस्येला मौलिक महत्त्व देऊन विचार करणे सुरू केले. अनेक मार्ग अवलंबिले गेले. परंतु जर्मनीच्या एका यहुदी माणसाने आपले विचार पुढे मांडले. तो म्हणतो की जोपर्यंत साधन संपत्तीला राज्याची संपत्ती गणले जात नाही तोपर्यंत ही आर्थिक दु:स्थिती नष्ट होणे अशक्य आहे. त्या काळी मानवी समस्येच्या समाधानासाठी हा विचार प्रभावीपणे पुढे आला आणि जगातील अनेक देशांनी या मताच्या आधारे संस्था उभ्या केल्या. जग समजून बसले की

आर्थिक समस्येचे पूर्ण समाधान या विचारात (साम्यवाद) आहे.

परंतु ही साम्यवादी (कम्युनिस्ट) व्यवस्था मानवतेसाठी विनाशकारी सिद्ध झाली आहे. आम्ही जेव्हा साम्यवादावर टीका करतो तेव्हा साम्यवादी लोक म्हणू लागतात की हे लोक भांडवलशाहीचे प्रशंसक आहेत. जर तुमच्या मन:पटलावर अगोदरचे स्पष्टीकरण ताजे असेल तर आम्ही याहून अधिक अनिर्बंध लोकशाहीच्या विरोधी आहोत ज्यामुळे अनिर्बंध आर्थिक तत्त्वज्ञान जन्म घेते आणि साम्यवादाचा विरोध काही पुराव्यानिशी पुढे येतो.

साम्यवादाचा पाया बुद्धी विवेकावर आधारित नसून द्वेष, बदला आणि रागावर आधारित आहे. आर्थिक समस्यांचे समाधान जर फक्त भांडवलशाही नष्ट करण्यात असते तर द्वेष, राग आणि बदल्याच्या आगीत भांडवलदार भस्म झाले असते आणि मानवतेची त्यांनी चांगली सेवा केली असती. परंतु खरी समस्या भांडवलशाहीची आहे कारण हीच अनिर्बंध भांडवलदारी मनुष्याला अत्याचारी भांडवलदार बनवते. समाजातून ही दुष्टता अशा प्रकारे नष्ट होत नाही की भांडवलदारांना नष्ट केले जावे. जोपर्यंत दुष्टतेचे मूळ कारण भांडवलशाहीची भक्ती समाजातील लोकांच्या मनात घर करून आहे तोपर्यंत तुम्ही एका वर्गाला नष्ट करा की दुसरा वर्ग तयार होतो. म्हणून व्देषभावना व बदल्याची भावना त्यागून असे लोकमानस तयार केले गेले पाहिजे की त्या समाजातील लोक भांडवल (धन) जमा केल्यानंतरसुद्धा भांडवलशाहीचे भक्त (लक्ष्मीपूजक) बनू नयेत. समाज व्यवहारांसाठी भांडवलाची गरज आहे आणि संपत्तीला नष्ट करणे मानवतेची सेवा नव्हे तर निष्ठुरता आहे. म्हणून अशा स्थितीत फक्त एकच मार्ग उरतो आणि तो म्हणजे मानवतेसाठी असे समाजमन तयार केले जावे की भांडवलदार बनल्यानंतरसुद्धा लोकांनी (श्रीमंत झाल्यानंतर) भांडवलशाहीचे भक्त (लक्ष्मीपूजक) बनू नये. हे सर्वश्रूत आहे की भांडवलशाहीच्या विरोधात साम्यवाद (कम्युनिझम) प्रत्येक डाव खेळतो परंतु जिथे माणूस घडविण्याचा प्रश्न येतो तिथे मात्र हा वाद शांत होतो.

याविरुद्ध साम्यवादाने राज्याच्या संपत्तीचा नियम तयार केला. याचेच दुसरे नाव आहे शासकीय भांडवलशाही ज्यात व्यक्तीच्या हातातील भांडवलशाहीला नष्ट करून त्या संपत्तीला राज्याची संपत्ती ठरविले जाते. हा वाद (तत्त्वज्ञान) दिसायला सोपा आहे तितकाच व्यवहारात अशक्य प्राय आहे. साम्यवाद तसे फक्त तत्त्वज्ञानच नाही तर व्यवहारात तो जगात बऱ्याच देशात कार्यान्वित आहे. (रशिया जो साम्यवादाचा पुरस्कर्ता होता तिथे मात्र आज साम्यवाद अंतिम श्वास घेत आहे. सोव्हियत युनियनचे जगाच्या नकाशावरून नामोनिशान मिटले आहे.) म्हणून वस्तुस्थितीनुरुप हे स्पष्ट झाले आहे की साम्यवाद व्यावहारिक जगात मात्र असफल ठरला आहे.

तुम्ही जगाच्या सद्यस्थितीशी सुपरिचित असाल तर कळेल की आज फक्त भांडवल व संपत्तीला राज्याची संपत्ती आणि वैयक्तिक संपत्तीलासुद्धा राज्याची संपत्ती

ठरवून आर्थिक समस्यांचे समाधान मुळीच होऊ शकत नाही ज्यासाठी साम्यवाद मोर्चा उघडून होता. (सोव्हियत युनियन (सोव्हियत संघ) च्या अध:पतनाने हे सिद्ध केले आहे) साम्यवादाच्या दृष्टिकोनातूनही भांडवलशाही फक्त याचे नाव नाही की एक सावकार किंवा जमीनदार संपत्तीचा अथवा जमिनीचा जास्त हिस्सा काबीज करून आहे आणि समाजातील इतर लोक त्याहून कमी प्राप्त करून आहेत. साम्यवादाजवळ भांडवशाही यालासुद्धा म्हटले जाते की एखादा माणूस आपल्या कुव्वतीने, पात्रतेने आणि बुद्धी कौशल्याने दुसऱ्यांपेक्षा जास्त कमवितो. या नियमाच्या प्रकाशात पाहिले तर कळते की रशियामध्ये भांडवलशाहीची ती व्यवस्था नष्ट झाली होती ज्या व्यवस्थेने युरोपमध्ये युरोपच्या आर्थिक जगात विनाशाचे थैमान घातले होते. ती आर्थिक उच्चनीचता जी पूर्वी मजूरवर्ग आणि भांडवलदार वर्गात होती तीच व्यवस्था तेथील समाजात कायम होती. (भेदाभेदनीती) तिथे पुरातन भांडवलदारशाहीला तर नष्ट केले आणि त्या जागी एक नव्या प्रकारच्या उच्चनीचतेचा, भेदाभेदच्या भांडवलशाहीला जन्म दिला होता. (आणि याच कारणामुळे सोव्हियत संघाचा विनाश झाला) येथे आपण हे म्हणू शकतच नाही की साम्यवादाने भांडवलशाहीला नष्ट केले आणि समाजात आर्थिक विषमता दूर केली ज्याला अनिर्बंध लोकशाहीवादाने जन्माला घातले होते.

या नियमाची निष्फळता फक्त हीच नाही की त्याने आर्थिक विषमता नष्ट केली नाही तर त्यापेक्षा जास्त वाईट हे आहे की जेव्हा हा नियम समाजात आपले परिणाम दाखवू लागतो तेव्हा एक सर्वसामान्य स्थिरता समाजात भासू लागते. कारण वैयक्तिक संपत्तीविषयीचा जो एक विचार समाजात फैलावतो तो राज्याच्या संपत्तीत परिवर्तित झाल्याने नष्ट होतो. परंतु येथे मात्र नाखुशी व कामचलाऊ वृत्तीला बळ मिळते. याचे उदाहरण म्हणजे एका मोहल्ल्यातील सर्व मुले एकत्रितरित्या सांभाळण्यासाठी एकाच स्त्रीकडे दिले तर त्या सर्व मुलांशी तिचे आईप्रमाणे मन:पूर्वक संबंध आणि ममता असूच शकणार नाही. कर्तव्य म्हणून ती काम पार पाडेल किंवा शिक्षेच्या भयाने ममतेचा, प्रेमाचा आव आणू शकेल. जगातील कोणताचा बुद्धिवान मनुष्य म्हणू शकत नाही की ती दायी एका आईप्रमाणेच मुलांना प्रेम आणि ममता देते. कारण आंतरिक ओढ ही काही किराणा माल नाही की ज्याच्याजवळ खरेदीची जास्त क्षमता (पैसे) आहे त्याने जास्तीतजास्त विकत घ्यावे.

वैयक्तित मिळकती (संपत्ती) राज्याच्या हातात सुपूर्द करून त्यांच्या विचार आणि आचारात एकदम बदल होतो. मनुष्याच्या हातात लाखोकरोडोची संपत्ती आली तर तो जमिनीवर पाय ठेवण्याला आपली बेइज्जती समजू लागतो. तेव्हा अशा माणसांच्या हातात साम्यवादी (कम्युनिझम) व्यवस्थेत अगणित लोकांची संपत्ती आल्यावर आणि त्यांच्या उपजीविकेच्या चाव्या हातात आल्यानंतर ही मंडळी उदंड व अधिक मगरूर बनतात. वैयक्तिक भांडवलशाहीत हे अवगुण सापडत नाहीत, कारण येथे त्याची थोडी

संख्या अनेकांचे डोके खराब करून टाकते. जर तुम्ही म्हणत असाल की हे कसे शक्य आहे? तर ज्या भांडवलशाही आणि साम्राज्यवादाविरुद्ध तुम्ही लढाई करत आहात त्यात या थोड्याशा लोकांच्या हातात अमाप संपत्ती एकवटल्याने ते 'भगवान' बनले आहेत. ही स्थिती आज ही जगात आहे. जोपर्यंत परिणामकारक आणि योग्य उपाय लोकांना 'ईश्वर' बनण्यापासून रोखण्यासाठी सापडत नाही तोपर्यंत असे म्हणणे की हे अशक्य आहे तर ही तुमची मोठी चूक ठरेल.

कम्युनिझम समतेचा नारा देतो. साम्यवादी व्यवस्थेत सर्व एकसमान होतात. आम्हीसुद्धा समानतेचे प्रशंसक आहोत. इस्लामने खरोखर समानतेची शिकवण दिली आहे. परंतु आम्हाला त्या समानतेपासून काहीच देणे-घेणे नाही ज्याचे पाठ मार्कस्ने दिले आहेत. आमच्याजवळ मौलिक प्रश्न हा आहे की समानता संपत्तीत की परिणामात समानता असली पाहिजे? साधनांत (साधनसंपत्ती) समानतेचा दावा होतो तेव्हा हे मानवतेच्या मैत्रीचा पुरावा आहे. परंतु मार्कस् समानता अंतिम समजतो. साधनसामग्रीत (संपत्तीची) समानता मार्क्सला मान्य नाही. या समानतेच्या दृष्टिकोनाला आमचा विरोध आहे. जेव्हा अशा प्रकारच्या साम्यवादाविरुद्ध बुद्धीनिष्ठ टीका होते तेव्हा 'रशियाभक्त' लोक आरोप करू लागतात की हे भांडलदार लोकांचे एजंट आहेत. मला उत्तरात एवढेच म्हणावयाचे आहे की काय समानतेला अंतिम साध्य समजणे (जसे मार्क्स समजतो) मनुष्यपात्रतेची चेष्टा नाही काय? काय सरकारने जाहीर केले की मोटरने जाणारा आणि बैलगाडीने प्रवास करणारा दोघांना शेवटी एक समान रोजी दिली जाईल. काय मोटरने प्रवास करणाऱ्यावर हा अन्याय नाही? मार्क्सच्या या साम्यवादी सिद्धान्तानुरुप परीक्षेस बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा दिल्यावर मिळालेले गुण एकत्र करून सर्वांना समसमान वाटून दिले तर या तत्त्वज्ञानाला कोण स्वीकारील? याविरुद्ध सर्व बंड करतील. कारण हुशार आणि मेहनती विद्यार्थ्यांवर हा अन्याय आहे म्हणून आम्ही म्हणतो समानता साधनसामग्रीत असली पाहिजे. सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे जेणेकरून संधीचा फायदा घेऊन मनुष्य जीवनात सफल बनेल. आता जर कोणी संधी उपलब्ध असूनसुद्धा एखादा मनुष्य आळस, सुस्ती व निष्काळजीपणाने जीवनाच्या संघर्षात आपली हार स्वीकरतो. तेव्हा हा त्याचा स्वत:चा दोष आहे. जे विद्यार्थी अभ्यास न करता वर्षभर मौजमजेत राहातात ते शेवटी नापास झाले तर दोष त्यांच्याच आहे.

समानतेला अंतिम ध्येय समजण्याचे हे साम्यवादीत्व निव्वळ एक तत्त्वच बनून राहिले. सोव्हियत संघात एका क्षणासाठीसुद्धा व्यवहारात हे सिद्ध होऊ शकले नाही. रशियामध्ये तेथील नेतेमंडळी आणि अधिकारीमंडळी जसे जीवनमान जगले काय तेथील कष्टकरी, मजूर, शेतकरी लोक तसेच जीवनमान जगले? असे मुळीच नव्हते. म्हणून अशा तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन सर्वसामान्य जनतेला गुंगीत ठेवले जात होते. जनतेची फसवणूक केली जात होती आणि नेतेमंडळी याचा फायदा घेत होती. (शेवटी परिणाम

जो व्हायचा तोच झाला, सोव्हियत युनियन जगाच्या नकाशावरून कायमचेच नाहीसे झाले.)

मित्रानो! ही ती मूळ कारणे आहेत ज्यामुळे जगात आज बेचैनी, अस्वस्थता चहुकडे बोकाळली आहे. आता मूळ प्रश्न लोकांच्या लोकमानसचा बनला आहे. या अपयशी भांडवलवाद, साम्यवाद आणि लोकशाहीवादाच्या परिपेक्षमध्ये आणि त्यांच्या विरोधात किंवा त्यांच्याऐवजी सदाचारी व संतुलित जीवनव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे. आम्ही अभ्यासांती शोध घेतल्यानंतर समस्त मानवतेसमोर ती परिपूर्ण व्यवस्था (इस्लाम) ठेवत आहोत. विचारांती, अभ्यासांती आणि शोध घेतल्यावर उमगले की यातच जीवनसाफल्य दडलेले आहे तर त्यांनी पुढे यावे. जगातील कल्याणासाठी हाच एकमेव मार्ग स्वीकारणे अनिवार्य आहे तर आम्ही आवाहन करतो की त्यांनी या परिपूर्ण जीवनव्यवस्थेला प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी.

एका सदाचारी जीवनव्यवस्थेची गरज

(मौलाना सय्यद हामिद हुसैन यांचे हे भाषण त्यांनी अखिल भारतीय जमाअत-ए-इस्लामी हिंदच्या अधिवेशनात रामपूर येथे दि. २१ एप्रिल १९५१ रोजी दिले होते.)

अल्लाहच्या स्तुतिगानानंतर,

माझ्या प्रिय बंधुंनो!

आपण सृष्टीव्यवस्थेकडे बारकाईने लक्ष दिले तर जरूर आपणास कळेल की संपूर्ण व्यवस्थेत सुनियोजितता आणि शिस्त आहे. एक अत्यंत उच्च दर्जाचे संतुलन आणि शिस्त सृष्टीव्यवस्थेत आपणास पाहवयास मिळते. कोणत्याच प्रकारची बेशिस्त आणि अव्यवस्था दिसून येत नाही. आणि कधीही त्यातील संतुलन बिघडले आहे असे दिसून येत नाही. समस्त मानवजातसुद्धा याच सृष्टीचा एक भाग आहे. या संबंधानुरूप व्हायला हेच पाहिजे होते की आणि ही संतुलित व्यवस्थेची निकड आहे की माणुसकीच्या परिघातसुद्धा तशाच प्रकारची शिस्तबद्धता आणि संतुलित व्यवस्था असावी. त्यात एकी, सहकार्य आणि शांती सुरक्षा राहावी. दुसऱ्या शब्दांत समस्त मानवजात सृष्टी व्यवस्थेशी एकजीव झाली असती. परंतु अत्यंत खेदाची गोष्ट आहे की जगात समस्त मानवजात भांडणतंट्यात आणि उपद्रवात जखडून गेली आहे. मानवता विनाशाच्या खाईत जलदगतीने कडेलोट होऊ पाहत आहे. राष्ट्र राष्ट्राशी, एक वंश दुसऱ्या वंशाशी, एक जात दुसऱ्या जातीशी, एक धर्म दुसऱ्या धर्माशी फक्त रंग व भाषेच्या आधारावर आणि देश-प्रदेशच्या आधारावर, भांडवलदार आणि मजूरवर्गाच्या आधारावर एकमेकांचे शत्रू बनले आहेत. मानवता पराजित झाली आहे. शैतानी वृत्तीचा बोलबोला आहे. मानवी जग हिंस्र पशुंचा हिंसक प्राण्यांचा आणि मांसाहारी जनावरांचा आखाडा बनून राहिला आहे. उच्चभ्रू लोकांमध्ये आचारविचारांचे पतन शिगेला पोहचले आहे. सदाचार आणि सभ्यता दुर्मिळ होत चालली आहे. कुटुंबव्यवस्था नष्ट होत आहे. चहूकडे धोकाधडी, घोटाळे, भ्रष्टाचार दिनचर्या बनली आहे. राजकीय उलथापालथ जोरावर आहे. अनैतिकता, चारित्र्यहीनता, मानवतेची चेष्टा करत आहेत. या आजकालच्या सभ्य जगात उपद्रव आणि हिंसाचाराचे जितके प्रकार आहेत ते सर्व मानवतेवर स्वार आहेत.

जगातील महान विद्वान व पंडित या विनाशकारी स्थितीमुळे अत्यंत चिंतातूर आहेत. वर्तमानपत्रातील त्यांच्या भाषणांवरून असे कळते की त्यांना या मानवी समस्येचे समाधान त्वरित हवे आहे. म्हणून तर कधीकधी धर्माचा आधार घेऊन तर कधी मानवतेच्या आधारावर बंधुत्वाचे आवाहन केले जाते. कोणी आर्थिक समतेकडे बोलावितो तर कोणी अत्यंत गांभीर्याने एक शासनव्यवस्थेची घोषणा करतो. आर्थिक असमानतेला कोणी पुढे करून साम्यवादाला समाधानाच्या रूपात पुढे करतो तर कोणी भांडवली लोकशाहीला मानवी समस्यांच्या समाधानासाठी पुढे आणतो. संपूर्ण जग

साक्ष आहे की भांडवलशाही, साम्यवाद, लोकशाही इ. सर्व प्रकार यासाठी असफल ठरले आहेत. प्रत्येकाला जीवनव्यवस्था म्हणून घोर असफलता जगात लाभली आहे किंबहुना प्रत्येक वाद स्वत: सर्व मानवी समस्यांचे मूळ कारण सिद्ध झाले आहेत. साम्यवाद आणि भांडवली लोकशाहीवर अनेक विद्वानांनी त्यांच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकलेला आहे. परंतु जगाचे नेतृत्व आज ज्यांच्या हातात आहे जे शांतीचे दूत बनून बसले आहेत त्यांची मने आणि बुद्धी कुंठीत झाली आहे. ते मानवतेच्या या समस्येवर आणि त्याच्या समाधानावर वरवरचे विलाज करतात. त्यांना कल्पना नाही की मानवतेच्या समस्यांचा एकमेव उपाय कोणता आहे. यासाठी खरा उपाय निश्चित आहे. जगात असा कोणताच प्रश्न नाही ज्याचा कोणताच उपाय नाही.

आमच्या दृष्टीने या सर्व मानवी समस्यांचा एकमेव उपाय इस्लामी जीवनव्यवस्था आहे. जगात सुखशांती तेव्हाच नांदू शकते जेव्हा मानवता आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनाची पायाभरणी इस्लामच्या तत्त्वानुसार करेल. आमचे हे मत फक्त यामुळे नाही की आम्ही मुस्लिम आहोत आणि इस्लाम आमच्या ईमानचा अनिवार्य भाग आहे. परंतु आम्ही ऐतिहासिक पुराव्यानिशी आणि बुद्धीविवेकाच्या प्रकाशात दृढ विश्वास ठेवतो की इस्लामशिवाय जे काही उपाय आजपर्यंत करण्यात आले आणि यापुढे होतील ते सर्वच्या सर्व स्वत: जागतिक बिघाड आणि अशांततेचे मूळ कारण बनले आणि पुढे बनतील.

माझ्या प्रिय बंधुंनो! मनुष्य एक सामाजिक अस्तित्व आहे. तो जन्मापासून ते मृत्यूपर्यंत अनेकानेक संबंधांमध्ये जखडलेला असतो. तो या जगात डोळे उघडताच आईवडील आणि सगेसंबंधींशी संबंध ठेवण्यास बाध्य होतो. त्याचे संबंध कौटुंबिक, शेजारीपाजारी, आपल्या गावाशी, आपल्या देशाशी आणि समस्त मानवतेशी अनेकानेक प्रकारांनी जोडले जातात. कुठे आर्थिक क्षेत्रात, कुठे सामाजिक क्षेत्रात तर कुठे राजकीय आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारात संबंध जडतात. हे सर्व संबंध जर सत्य आणि नैसर्गिक, स्वाभाविक पायावर उभारले गेले तरच ही आशा धरली जाऊ शकते की जगात मानवी हक्कांची पायमल्ली कधीही होणार नाही आणि जगात शांती व समृद्धी नांदू शकेल. स्पष्ट आहे की या मानवी संबंधांना संतुलित स्वाभाविक व शाश्वत ठेवण्यासाठी एक अशा वैश्विक परिपूर्ण जीवनव्यवस्थेची आवश्यकता आहे जी अत्यंत संतुलित आहे, सुख-समृद्धी व विश्वशांतीची हमी देणारा आहे. मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रासाठी स्वाभाविक नियमावली देणारी आहे. ही जीवनव्यवस्था प्रत्येक मनुष्यासाठी त्याच्या कुव्वतीप्रमाणे उन्नतीचा व उत्कर्षाचा मार्ग प्रशस्त करते आणि अशी वैश्विक परिपूर्ण जीवनव्यवस्था प्रत्येक व्यक्तीसाठी, समाजासाठी, देशाचे आणि वंशाचे हक्क मानवतेच्या आधारावर निश्चित करते. अशा व्यवस्थेत उच्चनीचता नसते. त्यात श्रीमंत-गरीब, काळा-गोरा, पश्चिम-पूर्व असा अस्वाभाविक भेद नसतो. अशी व्यवस्था मानवतेची

वांशिक, प्रादेशिक व राष्ट्रीय आधारावर विभागणी करत नाही तर समस्त मानवजातीला मानवी बंधुत्वाच्या बंधनात जखडून ठेवते. अशी व्यवस्था जगाचे नेतृत्व आणि मार्गदर्शन अशाच लोकांच्या हातात देते जे वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात सदाचारी, सच्चरित्र असतात. मानवी इतिहास साक्ष आहे की आजपर्यंत कोणत्याच मोठ्यातल्या मोठ्या विद्वानांनी असा दावा केलेला नाही की त्यांनी कधी ही अशी परिपूर्ण जीवनशैली तयार केली आहे किंवा पुढे एखादा मनुष्य तयार करू शकतो. यात काहीच शंका नाही की जगात साम्यवाद आणि भांडवलदार लोकशाहीसारख्या अनेक असंतुलित जीवनव्यवस्था जगापुढे ठेवल्या आहेत. मात्र त्या सर्व मानवी समस्यांचे समाधान करू शकल्या नाहीत, उलट त्या सर्व व्यवस्था मानवतेच्या समस्यांचे मूळ कारण सिद्ध झाले आहेत. कुठे आर्थिक समस्यांवर काही प्रमाणात तोडगा निघाला तरी चारित्र्य, धर्म, ईश्वर यांचे दिवाळे काढण्यात आले आणि वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले. मनुष्याला जनावर समजून दोन वेळच्या चाऱ्याच्या बदल्यात त्याच्या बुद्धीला, कुव्वतीला, संपत्तीला, व्यक्तिस्वातंत्र्याला, अभिव्यक्ती स्वातंत्र्याला तसेच पत्नी व मुलाबाळांनासुद्धा राष्ट्रीय संपत्ती बनवून टाकले.

जिथे कुठे वैयक्तिक स्वातंत्र्य, पूजापाठ, उपासनास्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंदी नाही तिथे सार्वजनिक हित मात्र धोक्यात आले आहे. उपजीविकेचा प्रश्न अनुत्तीर्ण बनला आहे तर चारित्र्य आणि सभ्यतेला सुळीवर चढविण्यात आले. एखाद्या व्यवस्थेत जगाला त्यागून आध्यात्मिकतेच्या नावाने मुक्तीचा मार्ग दाखविण्याचा असफल प्रयत्न झाला परंतु तिथे जगातील प्रश्न मात्र अनुत्तरीतच राहिले आहेत. सदाचारी आणि सभ्य लोकांना जंगलाचा मार्ग दाखविला आणि जगाला शैतानाच्या हवाली करण्यासाठी खुले सोडण्यात आले. अर्थात आजपर्यंत समस्त मानवजात अशी संतुलित जीवनव्यवस्था जगाला देऊ शकली नाही आणि पुढेही देऊ शकत नाही.

एखादी व्यक्ती अथवा व्यक्तीसमूह अशी संतुलित, परिपूर्ण जीवनव्यवस्था बनवू इच्छित असेल तरी यशस्वी होऊ शकत नाही कारण त्यांच्याकडे ती साधने नाहीत जी या महान कार्यासाठी अत्यावश्यक आहेत. काय कोणी एखादा मनुष्य हा दावा करू शकतो की त्याच्याकडे अमर्याद ज्ञान आहे? त्याची बुद्धी परिपूर्ण आहे? तो इच्छा-आकांक्षा आणि वासनेचा दास नाही? तो न्यायाचा पुतळा आहे. द्वेष, खानदान, वंशीय, देशीय, राष्ट्रीय व क्षेत्रीय भावनांपासून अलिप्त आहे? तो जगातील समस्त मानवांची इच्छा आकांक्षा, गरजा, भावना आणि वासनांपासून अगदी परिचित आहे? काय तो मागील इतिहासाचे पूर्ण ज्ञान राखून आहे? आणि काय भविष्यात काय होणार हेसुद्धा तो जाणून आहे? जर असे नाही आणि निश्चित नाही, तर मग या गोष्टीची काय हमी आहे की मानवनिर्मित जीवनव्यवस्था मानवी कल्याण, शांती व सुखसमृद्धीचा वैश्विक राजमार्ग

प्रशस्त करेल? त्यात वर्तमान मानवी जीवनाच्या समस्त समस्यांचे पूर्ण समाधान असेल? आणि भविष्यातील समस्यांची उकल करण्याचे सामर्थ्य त्यात असेल. याचा हा अर्थ मुळीच नाही की जग नेहमीसाठी अशा प्रकाशापासून दूर ठेवले गेले आहे आणि जग अशा परिपूर्ण जीवनव्यवस्थेसाठी तडफडत राहील. नाही असे मुळीच नाही. परंतु वस्तुस्थिती ही आहे की अल्लाहने या परिपूर्ण जीवनव्यवस्थेसाठी पूर्ण व्यवस्था केली आहे. अल्लाह एक असे महान अस्तित्व आहे जो समस्त मानवजातीचा आणि सृष्टीचा निर्माणकर्ता, पालनकर्ता, शासनकर्ता मालक असल्याने प्रत्येक माणसाशी तो न्याय करू शकतो. अल्लाह अमर्याद ज्ञानाचा मूळ स्रोत आहे. अल्लाहची बुद्धी परिपूर्ण आहे. अल्लाह इच्छा आकांक्षा आणि वासनेपासून निरपेक्ष आहे. अल्लाह विशिष्ट समूह, जाती, वंश, राष्ट्र, रंगाच्या आधारावर संबंध ठेवत नाही. त्यामुळे पक्षपात, भेदाभेद व द्वेष येथे सापडू शकत नाही. अल्लाहजवळ समस्त मानवजातीचे रेकॉर्ड आदी ते अंतापर्यंतचे आहे. त्याला भविष्याचे पूर्ण ज्ञान आहे. अल्लाह मनुष्याच्या भावना, इच्छा-आकांक्षांना, गरजेला जाणून आहे आणि भविष्यातील माणसांच्या सर्व गरजा, इच्छा-आकांक्षा जगाच्या अंतापर्यंतच्या जाणून आहे. अल्लाह या सर्व सृष्टीचा नियंता व शासक आहे त्याची सत्ता अमर्याद आहे. तो इच्छिल तेव्हा त्याची सत्ता शासित करू शकतो, परंतु असे करणे अल्लाहच्या बुद्धिविवेकाच्या व नियोजनाविरुद्ध आहे. सृष्टीनिर्मात्याने मनुष्याच्या भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्या अमर्याद देणग्यांनी या सृष्टीला मालामाल केले आहे आणि मनुष्याला या सर्व गोष्टींवर अधिकार बहाल केला आहे. तर काय अल्लाहपासून मनुष्याच्या या सर्वात महान गरजेला पूर्ण करण्याचे राहून गेले असेल? नाही, असे मुळीच नाही, अल्लाहने मनुष्याला अंधारात भटकण्यासाठी आणि खड्ड्यात सतत पडण्यासाठी आणि भुलभुलय्यामध्ये चकरा मारण्यासाठी सोडून दिलेले नाही. त्याने समस्त मानवजातीसाठी एक वैश्विक परिपूर्ण अशी जीवनव्यवस्था लिखित स्वरूपात व व्यावहारिक रूपात जगाला दिली आहे. अल्लाहने मनुष्याच्या फक्त भौतिकच नव्हे तर आध्यात्मिक गरजांची पूर्ती करण्याची व्यवस्था केली आहे जी जगाच्या अंतापर्यंत राहणार आहे. याच कारणाने अल्लाहने पृथ्वीवर प्रत्येक काळात आणि प्रत्येक देशात आपले मार्गदर्शन देऊन प्रेषितांना पाठविले होते. शेवटी इस्लामच्या नावाने अल्लाहने समस्त मानवतेसाठी वैश्विक परिपूर्ण व संतुलित जीवनव्यवस्था अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकरवी अवतरित केली. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी या जीवनव्यवस्थेला (इस्लाम) आजपासून चौदाशे वर्षांपूर्वी व्यावहारिक रूप दिले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी इस्लामला मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात व जीवनव्यवहारात कार्यान्वित करून जगापुढे समस्त मानवतेच्या कल्याणासाठी एक आदर्श ठेवला आहे.

मी येथे हे स्पष्ट करू इच्छितो की इस्लामपासून अपेक्षित तो इस्लाम नाही ज्याचे प्रदर्शन मुस्लिम लोक शतकानुशतके आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात करत आहेत. तसेच जीवनाच्या अनेक क्षेत्रात जसे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक,

सांस्कृतिक, सभ्यता आणि चारित्र्यिक क्षेत्रात ते आजतागायत करत आलेले इस्लामचे प्रदर्शन इस्लाम नव्हे, ते इस्लाम नाही जे आज मुस्लिमांना त्यांच्या वारसाहक्कांत प्राप्त झालेले आहे. जो इस्लाम आज मुस्लिमांची अधिष्ठान बनला आहे तो इस्लाम नाही. तो इस्लामसुद्धा नाही ज्यात राष्ट्रभक्ती, लक्ष्मीभक्ती, देशभक्ती किंवा पोटपूजा आहे. वाडवडिलांकडून चालत आलेलासुद्धा इस्लाम नाही ज्यात इतर धर्माप्रमाणे पूजापाठ आणि विशिष्ट कर्मकांडांचा मिळून धर्म बनला आहे. तसेच तो इस्लामसुद्धा नाही ज्यात अल्लाहला मस्जिदमध्ये आणि खानकाहांमध्ये (मठात) बंदिस्त करून ठेवला आहे आणि त्याला परवानगी देण्यात आली नाही की त्याने सार्वजनिक क्षेत्रात आणि मानवतेच्या क्षेत्रात आपले आदेश चालवावे. खरा इस्लाम म्हणजे तो इस्लाम जो कुरआन आणि सुन्नत (हदीस) मध्ये सुरक्षित आहे. तो इस्लाम जो आदर्श खलीफांच्या राज्यकाळात अशी चालतीफिरती जीवनव्यवस्था प्रचलित होती ज्यामुळे सुखसमृद्धी आणि मानवी कल्याणाचा समुद्र उमडून आला होता. तो इस्लाम एकमेव अल्लाहच्या आज्ञापालनाची शिकवण देतो. तो इस्लाम समस्त मानवतेसाठी एक आदर्श, संतुलित आणि परिपूर्ण अशी जीवनव्यवस्था आहे आणि मानवतेला त्या इस्लामपासून लाभ उठविण्याचा तसाच अधिकार आहे जशा प्रकारे मानव अल्लाहच्या देणग्यांचा लाभ दररोज घेत आहे. मानवतेचे वैश्विक कल्याण आणि वैश्विक मुक्तीची हमी आणि परिपूर्ण व्यवस्था त्या इस्लामध्ये आहे जो कुरआन आणि सुन्नत (पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवन) मध्ये सुरक्षित आहे. थोडक्यात इस्लाम तर अशी स्वाभाविक, संतुलित व परिपूर्ण जीवनव्यवस्था आहे की ज्यात श्रद्धा, आस्थापद्धतींची शिकवण दिलेली असते. तर चारित्र्य घडणीसाठीचे नियम, सामाजिक आर्थिक नीतीनियम, राजकारण, आंतरराष्ट्रीय कायदेकानू आणि अशा प्रकारे मानवी जीवनव्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रातील समास्यांची उकल इस्लाम आहे. आजपासून चौदाशे वर्षांपूर्वी सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, नैतिक समस्यांचे परिपूर्ण समाधान इस्लामी जीवनपद्धतीने झाले आहे. हे ऐतिहासिक सत्य आहे. आजसुद्धा जीवनाच्या सर्वक्षेत्रातील समस्त समस्यांची उकल इस्लाम आणि फक्त इस्लाम आहे. कुरआन स्पष्टोक्ती आहे,

“आज रोजी मी तुमचा धर्म तुमच्याकरिता परिपूर्ण केला आहे आणि आपली कृपा तुम्हावर परिपूर्ण केली आहे आणि तुमच्यासाठी इस्लाम तुमचा धर्म (परिपूर्ण जीवन प्रणाली) म्हणून संमत केला आहे.” (दिव्य कुरआन, ५ : ३)

अशाच प्रकारे दुसऱ्या ठिकाणी सृष्टीनिर्माता अल्लाहने स्पष्ट केले आहे,

“अल्लाहजवळ तर परिपूर्ण जीवनव्यवस्था फक्त इस्लाम आहे.”

(दिव्य कुरआन, ३ : ८५)

येथे मी स्पष्ट करू इच्छितो की इस्लामविषयीचे हे स्पष्टीकरण मी फक्त श्रद्धेपोटी करत नाही. तर आम्ही जगातील अनेक धर्मांची इस्लामशी तुलना केली आणि

तुलनात्मक अभ्यासांति विचारांती या निर्णयाप्रत आलो आहे. जीवनव्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रांसाठी इस्लामच्या शिकवणी आणि आदेशांना जगातील दुसऱ्या सर्वजीवन व्यवस्थांपेक्षा आणि शिकवणींपेक्षा पूर्णत: स्वाभाविक, समस्त मानवजातीसाठी स्वीकृत असे आणि प्रत्येक देशासाठी आणि काळासाठी उपयुक्त व अत्यावश्यक सिद्ध झाले आहे. या आधारावर आम्ही आपणास विनंती करतो की व्देष, पूर्वग्रहदूषितपणा आणि संकुचितपणाचा चश्मा डोळ्यावरून काढून बुद्धीविवेकाने आणि पुराव्यानिशी इस्लामचा एक परिपूर्ण जीवनव्यवस्था म्हणून आढावा घ्या व त्यावर विचार करा. आपण मुस्लिम असा की मुस्लिमेतर, पाश्चिमात्य उच्चशिक्षित असा की पौर्वात्यपंडित, आपणास जर संतोष प्राप्त झाला व आपली खात्री पटली तर आपले हे कर्तव्य ठरते की इस्लामच्या तत्त्वानुसार समाज व देश निर्माणासाठी योगदान करावे जेणेकरून विश्वकल्याण व विश्वशांती स्थापित होईल.

आता आम्ही हे स्पष्ट करू इच्छितो की इस्लाम आजच्या वैश्विक समस्यांचे समाधान मौलिक स्वरूपात कशा प्रकारे देतो आणि इस्लाम आणि इस्लामच फक्त एकमेव उपाय म्हणून स्वीकार्य कसा आहे? आपणास या गोष्टीचे आश्चर्य वाटेल की जगाचे उत्कृष्ठ वाद (व्यवस्था) म्हणजे साम्यवाद (कम्युनिझम) आणि लोकशाहीवाद, भांडवलशाही इ. वैश्विक समस्यांचे समाधान करण्यास पूर्ण असफल ठरले. इस्लाम एक पुरातन जीवनव्यवस्था असूनसुद्धा विश्व अशांती व उपद्रव यांना वैश्विक सुखसमृद्धी व शांतीत परिवर्तित करून विश्वकल्याण कशा प्रकारे साध्य करू शकेल? आपण पूर्ण विश्वास ठेवा आणि आत्मिक समाधान बाळगा की विश्वकल्याण साधणे इस्लामसाठी अशक्यप्राय गोष्ट नाही तर हे एक ऐतिहासिक सत्य आहे. मानवी इतिहास त्याची साक्ष आजसुद्धा देत आहे. चौदाशे वर्षापूर्वी इस्लामच्या तत्त्वांवर आधारित समाज व राष्ट्राचे नवनिर्माण करून एक आदर्श समाज व देशनिर्मिती झालेली आहे.

इस्लाम वैश्विक समस्यांचे समाधान करण्यासाठी व्यावहारिक उपाय देत आहे. आजचा मानवी समाज ज्या मौलिक तत्त्वांवर आधारित आहे, नीती सभ्यतेची व्यवस्था त्या तत्त्वांनुसार चालत आहे. नैतिकतेत, वैयक्तिक व सामाजिक चारित्र्यात, राजकारणात, समाजकारणात व अर्थकारणात निधर्मियतेने, चंगळवादाने, भ्रष्टाचाराने, धोकाधडीने थैमान घातले आहे. या सर्व दुराचारांना आणि शैतानी कृत्यांना समुद्रात बुडवून एक अशा आदर्श समाजाचे व राष्ट्राचे नवनिर्माण खालील तत्त्वांवर करावे लागणार आहे.

१) शासनव्यवस्थेचे एकत्व, २) मानवतेचे एकत्व, ३) जीवनव्यवस्थेचे एकत्व, ४) जीवनध्येयाचे एकत्व आणि ५) उपयोग एकत्व (फायद्याचे एकत्व).

१) शासनव्यवस्थेचे एकत्व :

सर्वप्रथम शासनव्यवस्थेच्या एकत्वाविषयी पाहू या. आज जगात चहुकडे सत्तेसाठी भांडणे चालू आहेत. प्रत्येक राष्ट्र, प्रत्येक देश व प्रदेश आणि प्रत्येक राजकीय

पक्ष महत्त्वकांक्षा राखून आहे की जगाचे नेतृत्व त्याच्या हातात यावे. म्हणूनच दररोज वर्तमानपत्रात बातम्या येतात की जर अमुक अमुक तत्त्वावर आधारित पक्ष आणि राष्ट्राला जगाचे नेतृत्व दिले तर विश्वातील सर्व चिंता दूर होतील. म्हणून प्रत्येक पक्ष व राष्ट्र जगाचे नेतृत्व हाती मिळण्यास आतुर आहे. परिणाम आजपर्यंत हाच हाती आला आहे की जग आज सत्ताप्राप्तीचा आखाडा बनला आहे. जेव्हा निरनिराळे राष्ट्र आणि प्रदेश सत्तेची खुर्ची बळकावतात तेव्हा सत्तेच्या नशेत मगरूर होऊन संपूर्ण विश्वाच्या सत्ताप्राप्तीला आपले अंतिम ध्येय समजतात. मागील दोन विश्वयुद्ध आणि इतरांचे प्रदेश बळकावण्याची साम्राज्यवादी वृत्ती याचेच द्योतक आहे. आज हा संघर्ष तर इतका तीव्र बनला आहे की तिसऱ्या विश्वयुद्धाचे ढग डोक्यावर घोंघावत आहेत. ही सर्व अस्वस्थता सत्ताप्राप्तीसाठी आहे. समस्त विश्वातील माणसांचे एकाच शासन-व्यवस्थेसाठी एकमत झाले तर सर्व सत्तासंघर्षे संपुष्टात येतील आणि 'एक विश्व एक शासन' हे तत्त्व व्यवहारात प्रत्यक्ष उतरविता येईल आणि शेवटी सत्तेसाठी संघर्ष जगातून नाहीसा होईल. परंतु प्रश्न हा निर्माण होतो की ही विश्वसत्ता कोणत्या दलाच्या अथवा राष्ट्राच्या हातात सोपवावी? काय खरोखर एखादा मनुष्य अथवा दल या पात्रतेचा आहे की समस्त विश्व त्याची सत्ता मान्य करेल? जर असे शक्य झाले तरी असा मनुष्य अथवा दल जगात हुकूमशाह बनणार नाही याची काय शाश्वती? आणि काय तो मनुष्य अथवा दल या अमर्यादित सत्तेच्या नशेत धुंद होऊन न्याय व शांततेचा खून तर करणार नाही? मनुष्याला मर्यादित स्वरूपाची सत्ता जरी प्राप्त झाली तर तो त्या काळापुरता फिरऔन, हिटलर बनतो हा इतिहास आहे. अशा स्थितीत मनुष्याला संपूर्ण विश्वाची अमर्याद सत्ता बहाल केली तर तो क्रूरतम, अन्यायी सत्ताधारी बनण्यापासून त्याला कोण रोखणार? इतिहासाला याचे अनेक दाखले देता येतील. आजसुद्धा 'सभ्य' राष्ट्रात ही वस्तुस्थिती पाहावयास मिळते. एका दलाकडे विश्वसत्ता सोपविणे हासुद्धा उपाय योग्य ठरणार नाही. संयुक्त राष्ट्र संघ (युनो) आणि पूर्वीचे लीग ऑफ नेशन्स यांचे उदाहरण जगासमोर आहे. युनो आज दोन दलांत विभागला जाऊन विश्वासाठी धोकेदायक बनला आहे. मनुष्यात अनेक त्रुटी आणि कमजोरी असणे स्वाभाविकतेचा भाग आहे. म्हणून तर मनुष्यनिर्मित सत्ता आजपर्यंत विनाशकारीच सिद्ध झाली आहे व उपद्रवी सिद्ध झाली आहे. याचा हा अर्थ मुळीच नाही की विश्वसत्तेचे एकत्व अशक्यप्राय गोष्ट आहे. इस्लामी शिकवणीनुसार अल्लाह संपूर्ण सृष्टीचा निर्माणकर्ता, पालनकर्ता व शासनकर्ता आहे. त्याच्या हाती विश्वसत्ता सोपविली गेल्यास तो अत्याचारी व अन्यायी शासक कधीही बनू शकणार नाही, कारण अल्लाहला सत्तेची लालसा नाही. अल्लाहचे प्रभुत्व व शासनाधिकार तर मूळत: समस्त सृष्टीवरच आहे. म्हणून अल्लाह इच्छा-आकांक्षा, भावना इ.पासून निरपेक्ष आहे. अल्लाह न्यायनिष्ठ आणि न्यायाधीश आहे. अल्लाह द्वेष व सूडभावनांपासूनसुद्धा निरपेक्ष आहे. अल्लाहला एकमेव सत्ताधीश म्हणून विश्वसमुदायाने स्वीकारल्यास सर्व समस्यांच्या गाठी आपोआप सुटतील. विश्वातील प्रत्येक मनुष्य अल्लाह सत्ताधीश, प्रभुत्वशाली आहे हे

मान्य करू शकतो कारण अल्लाहचा खास संबंध एखाद्या खास समुदायाशी व जातीशी नाही ज्यामुळे अल्लाह भेदाभेदाची नीती अवलंबू शकेल. एकमेव अल्लाह सर्वसत्ताधीश, सार्वभौम व प्रभुत्वशाली आहे, हे मान्य केल्यास सत्तासंघर्ष जगातून कायमचाच नष्ट होणार आहे. येथे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की अल्लाह स्वयं मनुष्यरूप धारण करून सत्ताधीश होणार नाही तर या जबाबदारीला मनुष्यालाच पार पाडावे लागेल. ती माणसे माणुसकीचे रत्ने असतील कारण त्यांचे अल्लाहशी प्रगाढ प्रेम असेल आणि ती माणसे अल्लाहच्या कोपाचे भय बाळगणारी ईशपरायण असतील. अल्लाहच्या आदेशावर चालणारी अशी आज्ञाधारक, सदाचारी, सच्चरित्र आणि विश्व व्यवस्थापनाला अगदी पात्र असतील. अल्लाहसमोर उत्तरदायित्वाची त्यांना अतीव भीती राहील, ज्यामुळे अल्लाहच्या मर्जीविरुद्ध एखादे काम करतानाचा विचार मनात आल्यावरसुद्धा भीतीने घामाघुम होतील. अशी माणसे (समुदाय) अल्लाह एकमेव सत्ताधीश आणि प्रभुत्वशाली मानून त्याचे प्रतिनिधी म्हणून सर्व जबाबदाऱ्या पार पाडतील आणि स्वत: अल्लाहच्या आदेशांना आपल्या जीवनव्यवहारात तंतोतंत पाळतील किंवा तसा प्रयत्न करतील. असा दल अथवा लोकसमुदाय सत्ता आणि संपत्तीला अल्लाहचा आदेश समस्त विश्वात लागू करण्यासाठीच खर्च करत राहील. अशा पद्धतीने प्रत्येक देश व प्रदेश आपापली जबाबदारी पार पाडेल. अल्लाह सत्ताधीशाच्याच हुकुमाने आणि ईशपरायण लोकांच्याच हस्ते शासनाधिकाराचा वापर समाज, देश व विश्व कल्याणासाठी होत राहील. अशा प्रकारे जगात 'शासनव्यवस्थेचे एकत्व' प्रचलित होईल आणि जगात मानवी सत्ताधीशशाहीचा अंत होईल. अशा प्रकारे एक भंयकर उपद्रवी व विनाशकारी जीवनव्यवस्था प्रणालीचा अंत होईल.

२) मानवतेचे एकत्व :

आधुनिक समाज व राष्ट्र नवनिर्माण कार्याचा दुसरा महत्त्वाचा घटक व तत्त्व 'मानवतेचे एकत्व' आहे. हे तत्त्वसुद्धा आधुनिक विश्व समस्यांच्या समाधानासाठी फार उपयुक्त आहे. आज समस्त मानवतेला अस्वाभाविक आधारावर विभागले गेले आहे. ही कृत्रिम आणि अनैसर्गिक विभागणी भौगोलिक, वांशिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि मानवी आधारावर केली आहे. या अस्वाभाविक विभागणीमुळे प्रत्येक समूह प्रत्येक राष्ट्र एकमेकांशी शत्रुत्व राखून आहे. आज शक्तीमान शक्तीहीनाला गिळंकृत करण्यात मग्न आहे. एका देशाचा मनुष्य दुसऱ्या देशाच्या माणसाशी मित्रत्वाचे नाते मानवतेच्या आधारावर ठेवण्यास तयार नाही. दुसऱ्या राष्ट्राच्या मनुष्याला शंकेने पाहीले जाते. त्याला हेर समजले जाते आणि त्याला नागरिक हक्कांपासून आणि सहानुभूतीपासून दूर ठेवले जाते. या द्वेषापोटी विश्व मानव दुसऱ्या विश्वमानवाला माणुसकीच्या दृष्टिकोनातून अस्वीकार्य करू लागला आहे. काय माणुसकीचा यापेक्षा जास्त अपमान आणखी काय होऊ शकतो? या अमानवी आणि चिंताजनक स्थितीला काबूत

आणण्यासाठी प्रत्येक विश्वमानावाने आणि विश्व राष्ट्राने मानवतेच्या एकत्वाचा स्वीकार करून आपली राष्ट्रीय व्यवस्था स्वतःच पार पाडावी. परंतु त्याबरोबर विश्व मानवाच्या कल्याणाचासुद्धा प्रयत्न केला जावा. हीच माणुसकीची निकड आहे आणि यातच राष्ट्रीय सफलतेचे गमक आहे. इस्लामची वास्तविकता हीच आहे की माणुसकीत समानतेचे एकत्व आणि सहकार्य आणि एकी व्हावी. हे यासाठी की जगातील सर्व माणसे मग ते कुठेही राहात असोत, कोणतीही भाषा बोलत असोत, कोणत्या ही वंशाशी अथवा राष्ट्राशी त्यांचा संबंध असोत, ते सर्व एक आईवडिलांची संतान आहे. सर्वांचा एकच मालक आणि पालक आहे. सर्व त्याचेच दास आणि प्रजा आहेत. अल्लाहच्या राज्यात सर्व जण आपापसात मेलमिलाप आणि विश्वबंधुत्व स्थापित करू इच्छितात. यांना वांशिक आणि राष्ट्रीय भेदाभेद नापसंत आहे कारण त्यामुळे मानवी समाज विखुरला जातो. अर्थात सदाचार आणि दुराचाराचे भान असले तर सदाचाराचा फैलाव होऊन दुराचाराला विश्वसमाजात प्रतिबंध बसेल आणि समस्त विश्वमानव सदाचारी बनेल.

अशा प्रकारे विश्वसमाजात मानवतेची चाड राहील. मानवतेच्या एकत्वाचे हे तत्त्व की विश्वाचा मालक, पालक, शासक, अल्लाह आहे आणि विश्वातील समस्त मानव त्याची निर्मिती आहेत. सर्व जमीन (पृथ्वी) मानवांची सामाईक देश व भूमी आहे. मौलिकतेत जर प्रत्येक राष्ट्र हे कबूल करेल आणि त्याप्रमाणे आपले राष्ट्रीय कार्यान्नियन बदलेल तर दुसरी अडचणसुद्धा दूर होणार नाही का? देशादेशातील भांडण तंटे नाहीसे होणार नाहीत का? काळे व गोरे आपसात विश्वबंधुत्वाच्या नात्याने राहू शकणार नाहीत का? राष्ट्रीयता, राष्ट्रभक्ती आणि वांशिक द्वेष नष्ट होणार नाही का? सामाजिक विषमता, असंतुलन कायमचे गाढले जाणार नाहीत का? शेवटी हिटलरची (अमेरिकेचीसुद्धा) वाहवा करणे थांबेल आणि विश्वातील प्रत्येक देश 'अल्लाहशासित' म्हणून गर्व करू लागेल.

३) जीवनव्यवस्थेचे एकत्व :

आधुनिक समाज व राष्ट्राचे आणि पर्यायाने विश्वसमाजाचे नवनिर्माण करण्यासाठी तिसरे तत्त्व 'जीवनव्यवस्थेचे एकत्व' हे आहे. ज्यानुसार आदर्श समाजाचे, राष्ट्राचे आणि विश्वसमाजाचे स्वप्न साकार होणार आहे. जीवनव्यवस्थेचे एकत्व म्हणजे संपूर्ण विश्व एकाच जीवनव्यवस्थेखाली यावे. विश्वातील सर्व माणसांचे नैतिक आणि सामाजिक ध्येयधोरणे व विचार एक असावे. सर्वांची संस्कृती व सभ्यता सामायिक असावी. सर्वांच्या सामाजिक व राजकीय ध्येयधोरण व विचारात एकता असावी आणि सर्वांचे आपापसातील परस्परसंबंध सामायिक तत्त्वांवर आधारलेले असावेत. मग ही जीवनव्यवस्था मानवनिर्मित नसावी कारण मनुष्यातील दोष, त्रुटी आणि कमजोरीमुळे मानवनिर्मित जीवनव्यवस्था न्यायिक व स्वाभाविक तत्त्वांवर आधारित राहात नाही, हे

आपण मागे सविस्तरपणे पाहिले आहे. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राच्या जीवनव्यवस्थेलासुद्धा स्वीकारणार नाही. परंतु जगातील प्रत्येक राष्ट्र ईशनिर्मित जीवनव्यवस्था स्वीकारू शकेल, कारण ईश्वर विशिष्ट राष्ट्र व वंशासाठी जीवनव्यवस्था बनवित नाही तर ती एक वैश्विक व्यवस्था आहे. आज विश्वातील सर्व राष्ट्रांनी स्वयं (मानव) निर्मित जीवनव्यवस्था स्वीकारलेली आहे, ज्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भांडणतंटे आणि उपद्रव जगात जोर धरून आहेत. साम्यवाद (कम्युनिझम) आणि भांडवलशाही यांच्यातीला शिगेला पोहचलेले शीतयुद्ध याचाच परिणाम आहे. विश्वसमाजाची जीवनव्यवस्था फक्त एकमेव इस्लामची राहिली, जिला मानवांच्या निर्माणकर्ता आणि पालनकर्ता अल्लाहने निर्माण केले आहे, तर जग अव्यवस्था व बेचैनीपासून दूर होणार नाही का? काय विश्वसमाजाचे परस्परांतील संबंध विश्वबंधुत्वाचे स्थापित होणार नाहीत? विश्वशांती व विश्वकल्याण साधण्यासाठी इस्लामी जीवनव्यवस्थेत विश्वसमाज आगेकूच करणार नाही का?

४) जीवनध्येयाचे एकत्व :

आधुनिक समाज व राष्ट्र नवनिर्माण कार्यांचे चौथे महत्त्वाचे तत्त्व जीवनध्येयाचे एकत्व आहे. ज्याचा अर्थ विश्वातील सर्व माणसांनी एकाच जीवनध्येयाचा स्वीकार करावा आणि आपली सर्व पात्रता आणि कुव्वत या जीवनध्येयाला प्राप्त करण्यासाठी खर्च करावी. आपणांस माहीत आहे की आज जगात विविध राष्ट्रांचे विविध ध्येय आहेत. प्रत्येक राष्ट्राचे ध्येय वेगळे आहे. प्रत्येक मनुष्याचे आणि कुटुंबाचे जीवनध्येय वेगवेगळे आहे. त्या वेगवेगळ्या ध्येयांना प्राप्त करण्यासाठी ते सर्व प्रयत्नशील असतात. अशा प्रकारे ही वेगवेगळी ध्येयधोरणे एकमेकांशी संघर्षरत राहातात आणि ती विश्वशांतीसाठी धोका सिद्ध झालेली आहेत. आश्चर्य म्हणजे ही ध्येयधोरणे नेहमीच बदलत राहातात, कारण सामान्यत: ती प्रासंगिक आणि चुकीची असतात. आज जर देश स्वतंत्र करणे हे ध्येय असेल तर उद्या हेच राष्ट्र इतर राष्ट्रांना हडप करून त्यांच्यावर ताबा मिळवणे आपले धोरण निश्चित करते. संपूर्ण जग अशा प्रकारे विश्वपशुंचा एक आखाडा बनून जातो. जर समस्त विश्वाचे रहिवाशी एकदिलाने एकाच जीवनध्येयाला स्वीकारतील आणि सर्व मिळून त्या ध्येयप्राप्तीसाठी सामूहिकपणे प्रयत्नशील राहिले तर राष्ट्रीय व प्रांतिक संघर्ष बंद होईल. परंतु हा प्रश्न उद्‌भवतो की ते ध्येय कोणते असावे? कोणत्या राष्ट्राने आणि दलाने त्याला मांडावे? हा प्रश्न इतका महत्त्वाचा नाही कारण इस्लामच्या दृष्टिकोनातून मनुष्याच्या आयुष्याचे ध्येय आणि समस्त मानवतेसाठी जीवनध्येय निश्चित करणे हे फक्त आणि फक्त अल्लाहचेच काम आहे. अल्लाहच समस्त मानवजातीचा निर्माणकर्ता आणि पालनकर्ता असल्याने त्याला पूर्ण माहीत आहे की दासांना काय करावे लागेल. हे विश्वसमाजजीवनाचे ध्येय विश्वकल्याणासाठीच असेल. अल्लाहने आपल्या दया व कृपेने त्याच्या पैगंबरांकरवी हे मार्गदर्शन केलेले आहे.

विश्वातील सर्व माणसे मिळून आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनामध्ये अल्लाहच्याच विधीनियमांची अंमलबजावणी करू लागतील. अल्लाहची भक्ती आणि आज्ञापालन करीत राहातील. अल्लाहची मर्जी संपादन करण्यासाठी आणि अल्लाहला प्रसन्न करण्यासाठी एकीने प्रयत्न करू लागतील. सार्वजनिक स्वरुपात अल्लाहचा आदेश जीवनाच्या सर्व क्षेत्रांत अशा पद्धतीने लागू करावा लागेल जसा सृष्टीतील कण न् कण आणि आमच्या शरीराचा प्रत्येक अवयव अल्लाहच्या व्यवस्थेत व आदेशात जखडलेला आहे. म्हणून अल्लाहने कुरआनमध्ये मनुष्यजीवनाची गरज व आवश्यकता स्पष्ट केली आहे,

''आम्ही जिन्न आणि मानवांना फक्त यासाठी निर्माण केले की त्यांनी आमची भक्ती आणि आज्ञापालन करावे.'' (दिव्य कुरआन, ५१ : ५६)

५) उपयोग एकत्व (फायद्याचे एकत्व) :

आता आपण आधुनिक विश्वसमाज नवनिर्माण कार्यांचे शेवटचे मौलिक तत्त्व पाहू या. उपयोगाच्या (फायदा) एकत्वाचा अर्थ असा की आम्ही एका असा उपयुक्ततेवर की जे प्रासंगिक नष्ट होणारे आणि मर्यादित मुळीच नसावे तर ते शाश्वत, नष्ट न होणारे आणि अमर्याद असावे. विश्वातील प्रत्येक मनुष्य त्याला आपल्या प्रयत्नाने प्राप्त करेल आणि कोणीही वंचित राहाणार नाही. आज जगात स्वार्थ आणि चंगळवादाचा चहूकडे बोलबाला आहे. प्रत्येक जण जगाच्या पाठीमागे पळत आहे. त्याला वाटते की जगातील सर्व संपत्तीचा तोच मालक व्हावा. सृष्टीत जी साधनसामुग्री उपलब्ध आहे ती पृथ्वीवरील प्रत्येकाचा सामाईक वारसा आहे. जर प्रत्येक राष्ट्र आपल्या शक्तीनुसार या संपत्तीला हडप करण्याचा प्रयत्न करील तर हे कसे शक्य आहे की राष्ट्राराष्ट्रांत संघर्ष होणार नाही? म्हणून गोऱ्या राष्ट्रांची आताची युद्धेसुद्धा भौतिक फायद्यासाठी (खनिज तेलावर ताबा) व स्वार्थासाठीच लढली जात आहेत. गरीब श्रीमंताविरुद्ध, मजूर भांडवलदाराविरुद्ध, शेतमजूर जमीनदाराविरुद्ध, गरीब राष्ट्रे शक्तिवान राष्ट्रांविरुद्ध फक्त याच कारणाने संघर्षरत आहेत की त्यांच्या वाजवी हक्कांपासूनसुद्धा त्यांना परावर्तित केले जात आहे. अशा प्रकारे विश्वशांतीला आणखी धोका निर्माण झाला आहे. पृथ्वीवरील मर्यादित साधनसामग्री या स्वार्थी संघर्षाला कारणीभूत असल्याने जगात युद्ध सतत सुरूच आहेत. सारे जग आर्थिक घोट्याळ्यांचा बाजार बनले आहे. जगात चहूकडे अस्वस्थता आणि भीतीचे वातावरण आहे. असे वाटते की जग पूर्णत: नष्ट होऊन जाईल, आमच्या या उपयोगितेच्या तत्त्वाला स्वीकारले तर या सर्व समस्या सुटून जातात, कारण हा फायदा जगातील मर्यादित आणि तात्पुरता फायदा नाही तर परलोकातील शाश्वत आणि अमर्याद असा फायदा आहे. ज्याला वाटेल त्याने त्यास अमर्याद स्वरुपात प्राप्त करावे. कोणीही त्या फायद्यापासून वंचित राहणार नाही की ज्यामुळे द्वेष आणि शत्रुत्व निर्माण होईल. परलोक इस्लामी शिकवणुकीनुसार मृत्यूनंतर एक शाश्वत व अमर्याद जीवन

आहे. तेथील साधनसामग्री, देणग्या अमर्याद, शाश्वत आणि कधीही नष्ट न होणाऱ्या आहेत. जगातील ऐशोआरामाची साधने आणि देणग्या परलोक देणग्यांसमोर अतिक्षुल्लक आहेत. परलोकातील या देणग्या त्यांना प्राप्त होऊ शकतात जे अल्लाहच्या सत्तेला स्वीकारतात, मानवतेची सेवा करतात आणि अल्लाहद्वारे निर्मित जीवनव्यवस्थेचा स्वीकार करतात. अल्लाहच्या प्रसन्नताप्राप्तीसाठी जीवनभर अल्लाहचे दासत्व स्वीकारून असतात. भौतिक (जगाच्या) फायद्यापेक्षा परलोकाचा फायदा असा निश्चित फायदा आहे की विश्वातील सर्व माणसे त्यावर एकमत होतील आणि सहमत होतील. स्वार्थी विश्वभक्ती नष्ट होईल आणि एक महाभयंकर प्रश्न ज्याने जगाला नरक बनविले, तो निकालात निघेल. आम्ही येथे हे स्पष्ट करू इच्छितो की परलोक एक फक्त तत्त्वज्ञान आणि विचारांचे जग नाही तर ती एक वास्तविकता आहे. जरी आमच्यापैकी कोणीही पाहिलेले नाही की अनुभवले नाही परंतु जगाला परलोक अस्तित्वाची आणि त्याच्या वास्तविकतेची खबर त्या दलाने दिली आहे जो स्वत: परलोक पाहून आला आहे. ज्यांच्या सत्यतेविषयी, चारित्र्याविषयी शत्रू आणि विरोधकसुद्धा 'ब्र' काढीत नसत तर उलट त्यांची प्रशंसा करीत असत. हा दल इस्लामी भाषेत 'पैगंबरांचा दल' म्हटला जातो. आम्ही घरी बसून फक्त वर्तमानपत्राच्या आणि दूरदर्शनच्या बातम्यांवरून अनेक गोष्टीचे अस्तिव मान्य करतो, परंतु त्यांना आम्ही आपल्या डोळ्यांनी कधीही प्रत्यक्ष पाहिलेले नसते. मग अशा लोकांच्या माहितीला आम्ही का स्वीकारू नये ज्यांनी खोटे कधीही बोलण्याचा विचारसुद्धा केला नाही आणि ज्यांच्यापेक्षा जास्त सत्यवादी जगात दुसरा कोणी नाही. परलोकविचार तो विचार आहे जो आम्हाला एक जबाबदार जीवन जगण्यास बाध्य करतो आणि प्रत्येक दुराचारापासून जीवनात मनुष्याला दूर ठेवतो. मग तो दुराचार आणि अपराध एकांतात किंवा काळोखात करणारे का असेनात. परलोकध्यासामुळे मनुष्य आपल्या जीवनात सत्य आणि सदाचारावर कायम राहून सदाचाराचा फैलाव व दुराचाराला प्रतिबंध करतो. असा परलोकध्यास असणाऱ्या व्यक्तीचा दृढ विश्वास असतो की मृत्यूनंतर त्याला त्याच्या जीवनातील प्रत्येक कृत्यांचा व विचारांचा हिशोब अल्लाहसमोर द्यावा लागेल. काय एक जबाबदार व सदाचारी जीवन जगण्यासाठी प्रत्येक दुराचारापासून, दुष्ट आचार व विचारांपासून दूर राहून वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनाला सदाचाऱ्याच्या वेढ्यात जखडून टाकण्यासाठी, प्रत्येक क्षणी जीवनात सदाचार करण्यासाठी, तसेच सदाचाराचा प्रसार करणे आणि दुराचारापासून रोखण्यासाठीची परिपूर्ण व्यवस्था जगाने आजपर्यंत निर्माण केली आहे? उत्तर नकारात्मक आहे. जे काम शासनसत्ता करू शकत नाही ते महान कार्य परलोकध्यास तडीस नेतो. हे त्या विचाराला कार्यान्वित करण्याचा महान पुरावा आहे की परलोकविचार मान्य न केल्यास मनुष्याचा प्रत्येक जीवनव्यवहार बिघडून जातो आणि त्याला मान्य केल्यास संपूर्ण जीवनव्यवस्था दुरुस्त व ठीकठाक बनते. परलोकध्यास मानवी जीवनाच्या सफलतेसाठी पायाचा दगड आहे आणि जीवनातील श्रेष्ठतम अशी

वास्तविकता आहे. परलोकध्यास नाकारून जीवनातील वास्तविकतेची पूर्ण इमारत ढासळून जाते.

माझ्या प्रिय बंधुनो! आपण पाहिले की इस्लामची ही महत्त्वाची तत्त्वे जी शासनव्यवस्थेचे एकत्व, मानवतेचे एकत्व, जीवनव्यवस्थेचे एकत्व, जीवनध्येयाचे एकत्व आणि फायद्याचे एकत्व यावर आधारित आधुनिक विश्वसमाजाचे नवनिर्माण शक्य आहे आणि जीवनाच्या सर्व समास्यांचे समाधान प्राप्त होणे शक्य आहे. याच्या परिणामस्वरूप विश्वअशांती नष्ट होऊन विश्वसमाजात सुखसमृद्धी व शांतता नांदू लागते, ज्या प्रकारची शांतता आणि एकत्व सृष्टीमध्ये आढळते.

शेवटी आम्ही हे स्पष्ट करणे आवश्यक समजतो की जे काही येथपावेतो स्पष्ट केले आहे आणि आधुनिक विश्वसमाजाच्या ज्या समस्यांचे समाधान इस्लामच्या रूपात जगापुढे ठेवण्यात आले आहे ते काही निव्वळ बाष्फळ तत्त्वज्ञान नाही. ते स्वप्नाळू जगसुद्धा नाही तर एक ऐतिहासिक सत्य आहे. आपण चौदाशे वर्षांपूर्वीच्या मानवी इतिहासावर नजर टाकली तर ज्ञात होईल की या आधुनिक काळाप्रमाणेच तात्कालीन अरब जगतात आर्थिक, सामाजिक, राजकीय व नैतिक समस्या बोकाळल्या होत्या. त्यावेळीसुद्धा नैतिक मूल्यांना सर्रास पायदळी तुडविले जात होते. आर्थिक, सामाजिक विषमता होती. द्वेषापोटी एकमेकांचे रक्त पिढ्यानूपिढ्या सांडले जात होते. अतिप्रखर बदल्याची भावना तात्कालीन समाजात प्रचलित होती. त्या काळीसुद्धा यहुदी (इस्राईली) लोकांचा व्याजबट्याचा धंदा होता आणि भांडवलशाहीने देशाच्या आर्थिक स्थितीला खिळखिळे केले होते. हे निश्चित आहे की स्वरूपात बदल व अंतर आहे. आधुनिक युगातील या समस्यांचे स्वरुप अतिविशाल (वैश्विक) आहे. परंतु वास्तविकतेत आणि परिणामात काही एक बदल झालेला नाही. इतिहास साक्षी आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तात्कालीन सर्वंकष विस्कळीत व विनाशाच्या खाईत कडेलोट झालेल्या समाजाचे याच एकत्वांच्या पाच तत्त्वांच्या आधारे नवनिर्माण घडवून आणले होते. थोड्याच कालावधीत पैगंबरांनी एक आदर्श समाज घडवून जगापुढे नमुना (प्रमाण) ठेवला आहे. अरब जे दुराचारी होते, जे वंशभक्तीमुळे राजकीयदृष्ट्या विखुरलेले होते, जे एक दुसऱ्याच्या रक्ताने तहानलेले होते, तेच अरब जगाला सदाचाराचे धडे देऊ लागले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या समाज नवनिर्माण कार्यामुळे अरब राजकीयदृष्ट्या एक बनले आणि बाह्य शत्रुत्व आणि द्वेषाचे रूपांतर सहानुभूती आणि मैत्रित झाले. ते अरब आर्थिक भीतीमुळे आपल्या मुलींना जीवंत गाडत होते, ज्याप्रमाणे आज 'बर्थ कंट्रोल' (कुटुंबनियोजन) च्या नावाखाली मुलांना आईच्या पोटातच ठार मारले जाते; नवनिर्माणानंतर समाजात तेच अरब आपल्या मुलींची उत्तम देखभाल करू लागले होते. ज्यांना सभ्यता माहीत नव्हती ते जगाला सभ्यतेचे आणि नैतिकतेचे धडे देऊ लागले. जे धोकेबाजी, लूटमार आणि हिंसेत लतपत झालेले होते, तेच आता विश्वबंधुत्वाची, प्रेमाची, सहकार्याची जगाला शिकवण देऊ लागले. तात्कालीन अरब

जगतात व्यावहारिक जीवनात अशी क्रांती घडून आली की ते पद्दलित व्यवस्थेतून उठून शासन सत्तास्थानी जाऊन बसले तर सत्तेचा माज त्यांना कधीच चढला नाही. लाखो लोकांच्या जीवांचे रक्षणकर्ते बनले, परंतु सतत त्यांचा (प्रजेचा) सेवक समजत होते. जेव्हा ते विजयी होऊन रोम व इराणच्या राज्यसत्तेचे वारस बनले (सम्राट बनले) तेव्हासुद्धा त्यांना अमाप सत्ता व संपत्तीमुळे त्यांच्यावर काहीही परिणाम झाला नाही. राजकोशात करोडोंची संपत्ती जमा होत होती, परंतु त्यांनी त्यात एक पैशाचीसुद्धा अफरातफर केली नाही. आपल्या आवश्यक गरजांनाच फक्त भागविण्यासाठी मानधन राजकोशातून घेत असत व बाकी प्रजेच्या कल्याणासाठी व प्रगतीसाठी खर्च करून टाकीत असत. ते न्यायनिष्ठ होते. खलीफा आपल्या किंवा आपल्या कुटुंबीयांच्या विरोधातील न्यायिक निवाडा सहन करत व त्याला कार्यन्वित करत होते. ते सैन्यदलाचे कमांडर बनले परंतु त्यांनी शक्तीचा दुरपयोग केला नाही. त्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारण केले परंतु सत्यता, इमानदारी, न्यायनिष्ठतेला ते चिटकून राहिले. एकत्वाच्या या पाच तत्त्वांवर आधारित त्यांनी विश्वसमाजाचे नवनिर्माण करून दाखविले, ज्यात शांती आणि समृद्धी होती. या ऐतिहासिक सत्यतेची साक्ष जगात फक्त मुस्लिमच नव्हे तर मुस्लिमेतर विद्वानसुद्धा देत आहेत. आम्ही येथे फक्त भारतातील मुस्लिमेतर प्रसिद्ध व्यक्ती महात्मा गांधी यांचे उदाहरण देत आहोत. म. गांधी यांनी इ. सन १९३७ मध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या सभेत वक्तव्य केले होते. ते म्हणतात, ''भारताचे राज्य ते आदर्श खलीफांच्या काळातील राज्याप्रमाणे आणि काँग्रेसी राज्यकर्त्यांना आदरणीय खलीफा उमर फारुख यांचे अनुकरण करताना पाहाणे मी पसंत करेल.'' कोणी मान्य करो अथवा न करो, सूर्य सूर्यच आहे आणि त्यापासून प्रकाशच मिळणार, अंधार नव्हे. आजच्या आधुनिक काळात याच आदर्श तत्त्वांवर विश्व समाजाचे नवनिर्माण करण्याचे प्रयत्न झाले तर विश्वशांती पुन्हा नांदू लागेल. सुखसमृद्धीचे वारे जगात वाहू लागेल. आम्हाला सूर्य उगवण्याचा दृढ विश्वास आहे. त्याहून कितीतरी जास्त विश्वास व निष्ठा या सत्य गोष्टीवर आहे की इस्लामच्या या एकत्वाच्या तत्त्वांच्या आधाराविना विश्वअत्याचार, अन्याय व आतंकाचा आखाडा बनून राहील, जिथे शांती नावालासुद्धा सापडू शकणार नाही.

** समाप्त **